रायगड, बुधवार, दि. ३ सप्टेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## इंडिगो विमानाचे आपत्कालीन लँडिंग

**नागपूर** : नागपूरहून कोलकात्याला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानाला पक्षाने धडक दिल्याने त्या विमानाचे नागपूर विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. यावेळी विमानात २७२ प्रवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, इंडिगोचे विमान ६८१२ हे नागपूरहून कोलकात्याला चालले होते. विमानाने उड्डाण घेतल्यानंतर काही वेळाने पक्षी विमानाला धडकला. पक्षी धडकल्यानंतर विमानाचे संतुलन बिघडले आणि प्रवाशांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले. क्रू मेंबर्सकडून प्रवाशांना शांत राहण्याचे आवाहन करण्यात आले. पायलटने प्रसंगावधान राखत नागपूर विमानतळावर विमानाचे सुरक्षित आपत्कालीन लँडिंग केले. सर्व प्रवाशांना सुखरुप उतरवण्यात आले.

## आज शेकाप पदाधिकारी बैठक

**रायगड** : शेतकरी कामगार पक्ष रायगड जिल्हा नवनिर्वाचित पदाधिकारी बैठक व चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबागमधील चेंढरे येथील पीएनपी नाट्यगृहाच्या सभागृहात बुधवारी (दि.३) सकाळी अकरा वाजता ही बैठक शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. या बैठकीत शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्यासह माजी आमदार बाळाराम पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य खजिनदार अतुल म्हात्रे, शेकाप कार्यालयीन •> पान २ वर

# सरकार झुकले, मराठा जिंकले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मनोज जरांगे यांच्या मराठा आंदोलनाला मोठं यश मिळाले असून मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य असल्याचे सांगितले. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचे उपसमितीने मनोज जरांगे यांच्यासमोर मान्य केले आहे. तसेच, सातारा गॅझेटच्या मागणीवर जलदगतीने निर्णय घेणार असल्याचेही उपसमितीने मान्य केले आहे. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली गेले पाच दिवस मराठा बांधवांनी मुंबईत जाम केला आहे. अखेर न्यायालयाने सरकारला फटकारल्यानंतर तसेच आंदोलकांना तात्काळ आझाद मैदान सोडण्याबाबत आदेश दिल्यानंतरही मराठा बांधव मागे



हटले नाहीत. अखेर सरकारने नमतेपणा घेत मराठ्यांच्या काही मागण्या मान्य केल्या. परिणामी, गेले पाच दिवस सुरु असलेल्या या आंदोलनाला मोठे यश मिळाले असून मराठ्यांच्या आंदोलनाच्या हत्यारापुढे अखेर सरकारला नमतेपणा घ्यावा लागला.

मराठा उपसमितीसोबत झालेल्या चर्चेत मराठा आणि कुणबी एकच असल्याची मागणी जरांगे यांनी केली होती. त्यावर ही प्रक्रिया किचकट आहे, त्यासाठी एक-दोन महिन्यांचा वेळ द्यावा, अशी मागणी उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. •> पान २ वर

### उपसमितीकडून 'या' मागण्या मान्य

1. हैदराबाद गॅझेटची तातडीने अंमलबजावणी करण्यात येणार.
2. गावातील कुळातील नात्यातील व्यक्तींना चौकशी करून कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
3. सातारा गॅझेटवर अभ्यास करून त्याला जलद मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी आहेत, एका महिन्यात त्याला मान्यता देण्यात येणार आहे.
4. मराठा आदोलकांवरील या आधीचे गुन्हे सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येणार.
5. शैक्षणिक पात्रतेनूसार शासकिय नोकरी देणार.
6. मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये बलिदान दिलेल्या वारसांसाठी १५ कोटींची मदत देणार. आठवड्याभरात त्यांच्या खात्यात मदत जमा होईल.

## वेधक

### मराठा आंदोलकांना मारहाण

**पनवेल** : गाडी घासल्याच्या किरकोळ कारणावरून मराठा आंदोलकांना मारहाण करणाऱ्या पाच जणांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदान येथे सुरू केलेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी पुण्याहून पिकअप टेम्पो घेऊन मुंबईत जाणाऱ्या मराठा तरुणांना आठ ते दहा जणांनी किरकोळ कारणावरून बेदम मारहाण केली. ही घटना रविवारी (दि.३१) सायंकाळी घडली होती. या मारहाणीत पाच मराठा तरुण जखमी झाले. पनवेल शहर पोलिसांनी मारहाण करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यापैकी पाच आरोपींना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरू •> पान २ वर

### बसच्या चाकाखाली आल्याने मृत्यू

**आंबेजोगाई** : शहरातील पाण्याच्या टाकीजवळ मंगळवारी (दि.२) बसमधून उतरताना एका कर्मचारी महिलेचा बसच्या चाकाखाली आल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. विजयमाला सरवदे (५५) असे या अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. मंगळवारी सकाळी त्या केज येथून धारूर आगाराच्या धारूर-परळी या बसमध्ये बसल्या. अंबाजोगाईत आल्यानंतर पाण्याची टाकी येथे बसमधून उतरत असताना त्यांच्या साडीचा पदर अडकून खाली पडल्या. तेवढ्यात चालकाने बस हलवली आणि त्या बसच्या चाकाखाली आल्या. त्यांना स्वारातीमध्ये दाखल करण्यता आले. परंतू, डॉक्टरांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले.

### चालकाचा ताबा सुटल्याने अपघात

**सांगली** : चालू बसमध्ये पाणी पित असताना एसटी चालकाचा ताबा सुटल्याने मंगळवारी (दि.२) दुपारी वाघवाडीजवळ मोठा अपघात झाला. इस्लामपूर आगाराची कोडोलीमार्गे जाणारी बस मंगळवारी वाघवाडीजवळील एन. डी. पाटील शुगर कारखान्याच्या परिसरातून जात होती. यावेळी चालक हणमंत घोरपडे हा गाडीतच पाणी पित होता. त्याचवेळी बस भरधाव असल्याने त्याचा बसवरील ताबा सुटला आणि बस रस्त्याच्या कडेला जाऊन एका झाडावर आदळली. अपघातानंतर बस एका बाजूला कलली. अंदाजे २० ते २५ प्रवासी जखमी झाले. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाला.

# रायगडकरांना आशा, गोगावलेंची निराशा?

## मराठा आरक्षणातही पालकमंत्रीपदाचा विषय चर्चेत

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**



राजधानी मुंबईत सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाच दिवस उलटून गेले आहेत. सर्वत्र मराठा आरक्षणाचा विषय चर्चेत आहे. मात्र, अशा गंभीर विषयातही आ. भरत गोगावले यांनी केलेल्या पालकमंत्रीपदाच्या टिप्पणीमुळे ते पुन्हा एकदा चर्चेत आलेत. सरकार स्थापन झाल्यानंतर आजपर्यंत रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. अनेक कामे रखडली आहेत. आज ना उद्या हा तिढा सुटेल, अशी रायगडकरांना अपेक्षा आहे. मात्र, गोगावलेंची पुन्हा निराशा होणार का, असा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

आरक्षणाच्या मुद्यावरुन मराठा आंदोलक आक्रमक होत असून मोठ्या संख्येने आझाद मैदान परिसरात जमले आहेत. त्यामुळे, सरकारकडून आरक्षण मागणीचा हा तिढा नेमका कसा सुटणार, याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. त्याच पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांच्या बैठका सुरू असून मराठा आरक्षण संदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली. राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न गंभीर बनला असतानाच मंत्री गोगावले यांनी रायगड पालकमंत्रीपदाच्या प्रश्नावरही मजेशीर भाष्य केले. मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटला की रायगडच्या पालकमंत्रिपदाचाही प्रश्न मार्गी लागेल, असे त्यांनी म्हटले. •> पान २ वर

# बाप्पासह गौराईला निरोप

**। मंगलमय वातावरणात निघाल्या मिरवणूक । भावपूर्ण जयघोष करत अनेकांचे डोळे पाणावले**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

'गणपती चालले गावाला चैन पडे ना आम्हाला', 'पुढल्या वर्षी लवकर या', असा भावपूर्ण जयघोष करीत मंगळवारी (दि.२) सायंकाळी बाप्पासह गौराईला वाजत गाजत निरोप देण्यात आला. तलाव, नदी, समुद्र तसेच कृत्रिम तलाव अशा एकूण पाचशेहून अधिक ठिकाणी ७२ हजारहून अधिक मुर्तींचे विसर्जन करण्यात आले. सात दिवसांच्या पाहूणचारानंतर बाप्पाला निरोप देताना अनेकांचे डोळे पाणावले होते. ढोल ताशांच्या गजरासह बेंजोच्या वाद्याने मिरवणूक काढण्यात आली. त्यामुळे संपूर्ण जिल्हा दुमदूमून गेला होता.

जिल्ह्यामध्ये बुधवारी (दि.२७) गणरायाचे आगमन झाले. त्यानंतर रविवारी (दि.३१) गौराचे स्वागत घरोघरी करण्यात आले. •> पान २ वर



• (छायाचित्र : नितीन शेडगे)

# आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न

## कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाचा आरोग्य सेवेवर परिणाम

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचे परिपत्रक २०२४ मध्ये काढले होते. परंतु, एक वर्ष होऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी १९ ऑगस्टपासून बेमुदत संप पुकारला आहे. त्याचा फटका आरोग्य सेवेवर मोठ्या प्रमाणात बसला आहे. त्यामुळे आंदोलन मोडीत काढण्यासाठी प्रशासनाकडून कारवाइचा बडगा सुरु करण्यात आला आहे. अनेकांना नोटीसा बजावून वेतन थकविण्याची धमकी दिली जात असल्याचे चित्र आहे.

> **गेल्या पंधरा दिवसांपासून आंदोलन सुरु आहे. या संपाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. परंतु आंदोलन मोडीत काढण्यासाठी कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई सुरु करण्यात आली आहे. त्यांना नोटीसा देऊन धमकावले जात आहे.**
>
> **– विकास धुमाळ,** अध्यक्ष राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अधिकारी कर्मचारी संघटना, रायगड

जिल्हा परिषद आरोग्य व शासनाच्या आरोग्य विभागात अपुरे कर्मचारी असल्याने त्यांच्यावर कामाचा ताण पडत होता. त्यामुळे आरोग्य विभागाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातंर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी नेमण्याचा निर्णय काही वर्षापूर्वी घेतला होता. त्यानुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. वैद्यकिय अधिकाऱ्यापासून परिचारिका, आरोग्य सेवक अशी एकूण ७१ पदे भरण्यात आली. या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मदतीने आरोग्य सेवा बळकट करण्याचा प्रयत्न केला. तुटपुंज्या मानधनावर गेल्या अनेक वर्षांपासून हे कर्मचारी काम करीत आहेत. त्यांचे समायोजन करण्यात यावे, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होती. अखेर समायोजन करण्यासाठी २०२४ मध्ये परिपत्रक काढण्यात आले. वेगवेगळ्या विभागाची परवानगीदेखील घेण्यात आली. •> पान २ वर

# चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते बस स्थानकाचे उद्घाटन




**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**

राजकारणाचा दर्जा आणि पातळी अलिकडे घसरली आहे, असे मत शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या तथा मिडीया सेलच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केले. त्यांच्या खासगी निधीतून उभारण्यात आलेल्या अलिबाग तालुक्यातील कार्लेखिंड हाशिवरेमार्गे-रेवस या मार्गावरील जांभुळपाडा बस स्थानकाचे उद्घाटन मंगळवारी (दि.२) संपन्न झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील, नरेंद्र पाटील, विश्वनाथ पाटील, हिनेश पाटील, प्रकाश पाटील, वैभव पाटील, केतन पाटील, दयानंद पाटील, भरत पाटील, सुनिल धसाडे, निलेश पाटील, समाधान पाटील, महेश पाटील, अतुल घरत, दत्तात्रेय पाटील, धनुर्धर धसाडे, भुपेंद्र पाटील, प्रभाकर पाटील, पंकज पाटील, •> पान २ वर

**गणेशोत्सवात लोककलेला मागणी | तळ कोकणासह रायगडातही कलेचा विस्तार**

# जाखडी नृत्यांद्वारे गावोगावी घुंगरांचा निनाद


**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाचा जल्लोष रायगड जिल्ह्यात सुरु झाला आहे. दहा दिवसांपासून २१ दिवसांपर्यंत गणेशमुर्ती अनेक घराघरात विराजमान झाल्या आहेत. या कालावधीत सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांबरोबरच लोक नृत्यालाही महत्व दिले जात आहे. या निमित्ताने जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये जाखडी (बाल्या) नाचाची घुंगरे वाजत आहे.

जाखडी नृत्याचा उगम कोकण प्रांतातून झाला आहे. रायगड जिल्ह्यात दक्षिण रायगडपासून उत्तर रायगडमध्येदेखील या नृत्याला महत्व प्राप्त झाले आहे. बाल्या



नृत्याकडे पुर्वी मनोरंजन म्हणून पाहिले जात होते. महाभारत, रामायणाच्या कथा कलेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवत होते. हळूहळू या कलेचा विस्तार वाढू लागला. आता पुराणापासून ते आताच्या चालू घडामोडींवर गाणी गायली जातात. तळ कोकणातून पोलादपूर, महाड, रोहा या दक्षिण रायगडमध्ये बाल्या नृत्य सुरू झाले. १९ व्या शतकात सुरु झालेली ही कला रायगड जिल्ह्यात शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील वाढू लागली. त्यामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात गणेशोत्सवामध्ये या नृत्याला अधिक पसंती •> पान २ वर



# दिपाली ठाकूरचा कोट्यवधींचा घोटाळा उघड

## ● उरण पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**। उरण । प्रतिनिधी ।**

**उरण तालुक्यात जवळपास १० ते १२ कोटी रुपयांचा घोटाळा बोरखार गावात उघड झाला आहे. दिपाली अमित ठाकूर हिने मर्चंटिंग कंपनीच्या नावाखाली आणि कांता जयप्रकाश ठाकूर हिची मुलगी असल्याचा विश्वास संपादन करून अनेक गुंतवणूकदारांना कोट्यवधी रुपयांचा चुना लावला. याप्रकरणी न्हावा-शेवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु, पोलिसांनी तिला अटक केल्यानंतर काही दिवसांतच तिला जामीन मंजूर झाला. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.**




मिळालेल्या माहितीनूसार, उरण येथील मेघनाथ ठाकूर यांचे जयप्रकाश ठाकूर व काकी कांता ठाकूर नातेवाईक असल्यचा फायदा दिपाली ठाकूरने उचलला. मेघनाथ यांचा विश्वास संपादन करून, मार्चंटिंग कंपनीत गुंतवणूक केल्यास प्रचंड नफा मिळेल, अशा गोड आश्वासनांनी कोट्यवधी रुपयांची उकळी केली. दिपाली ठाकूर हिने मेघनाथ ठाकूर यांना तीन वेगवेगळ्या करारांत पैसे गुंतवायला लावले. त्यासाठी कौस्तुभ डाकी (बोरखार) याचे बाँड घेऊन, जर मी पैसे बुडवले तर राहते घर किंवा आवारातील जागा तुला देईन, असे लिहून दिले. तसेच, निर्मला पाटील (न्हावा) व शहाबुद्दीन शेख (मुंबई) हे बिझनेस पार्टनर असल्याचे सांगितले. परंतु, प्रत्यक्षात १ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम घेतल्यावर मेघनाथ यांना एकही रुपया परत दिला नाही. पैशांच्या मोबदल्यात बॉण्ड पेपरवर इतर दोन लोकांच्या नावाने करार, तसेच काही रकमेचे चेक देण्यात आले. मात्र, हे सर्व चेक बाऊन्स झाले आणि संबंधित बँक खाती बंद करण्यात आली. भीतीपोटी बऱ्याच लोकांनी तक्रार करण्यास टाळाटाळ केली. मात्र, सातत्यपूर्ण तक्रारीनंतर अखेर न्हावा-शेवा पोलिसांनी मोठी कारवाई करत दिपाली ठाकूरला बेड्या ठोकल्या. परंतु, काही दिवसांतच तिला जामीन मंजूर झाला. त्यामुळे कोट्यवधींच्या घोटाळ्यानंतरही आरोपीला काही दिवसांतच मोकळं सोडण्यात आले, हा दुहेरी न्याय सहन केला जाणार नाही, असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# मराठीसाठी गणरायाकडे साकडे

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

मराठी शाळा व मराठी भाषा टिकावी तसेच वृद्धिंगत व्हावी यासाठी रोहा तालुक्यातील वांगणी गावातील शिर्के कुटुंबीयांनी पुढाकार घेतला आहे. सु.ए.सो माध्यमिक विद्यालय वांगणी शाळेत इयत्ता नववीत शिकणारा विद्यार्थी आदित्य शिर्के आणि त्याच्या पालकांनी त्यांच्या घरगुती गणेशोत्सवात 'मराठी शाळा व मराठी भाषा वाचवा' या संकल्पनेवर आधारित अतिशय प्रबोधनात्मक देखावा साकारला आहे. त्यांनी या देखाव्याच्या माध्यमातून आपला खारीचा वाटा उचलला आहे. सर्वांनी यामोहिमेत सहभागी होऊन मराठी शाळा व मराठी संस्कृती वाचवण्याचा संकल्प करुया, असे आवाहन त्यांनी केले आहे.



विशेष म्हणजे हा देखावा बनवण्यासाठी त्यांनी कागद, पुठ्ठा व नैसर्गिक रंग अशा पर्यावरण पूरक साहित्याचाच वापर केला आहे. शिक्षक टिळक खाडे यांनी सांगितले की, मराठी भाषा आणि मराठी शाळा टिकवण्यासाठी शिर्के कुटुंबीयांनी हाती घेतलेला उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. या माध्यमातून मराठी भाषा वृद्धिंगत होण्यासाठी हातभार लागत आहे. शिवाय मराठी शाळा वाचवण्यासाठी जनजागृती होत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांची मांडवशेत आदिवासीवाडीला भेट

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

जनजातीय गौरव वर्षे २०२५ च्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आदिवासी समाजाच्या विकासासाठी दोन महत्वपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये प्रधानमंत्री जनजमाती न्याय महाअभियान आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अशा दोन योजनांचा समावेश आहे. याच उपक्रमांतर्गत आदिवासी समाजाच्या नागरीकांना सक्षम बनविण्यासाठी विविध योजना हाती घेतल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नुकतीच रोहा तालुक्यातील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील मांडवशेत आदिवासी वाडीवर जाऊन तेथिल नागरीकांच्या समस्या जाणुन घेतल्या आहेत.



यावेळी येथील नागरीकांनी आपल्याला भेडसावत असणाऱ्या अनेक समस्या जिल्हाधिकारी यांच्या समोर मांडल्या. या समस्यांमध्ये मांडवशेत आदिवासी वाडीकडे येणारा मुख्य रस्ता, अंतर्गत रस्ता, पाण्याची समस्या, घरकुल समस्या, दाखले तसेच रेशनकार्ड संबंधित अनेक समस्या उपस्थित करण्यात आल्या. त्यावर या सर्व समस्या भारती आबा विकास योजनेअंतर्गत लवकरात लवकर सोडविण्याचे प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी मांडवशेत ग्रामस्थांना दिले. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्यासह तहसिलदार किशोर देशमुख, सह गटविकास अधिकारी महादेव शिंदे, प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, विस्तार अधिकारी सुनिल गायकवाड, शाखा अभियंता अमित चिपळूणकर, ऐनघर सरपंच कलावती कोकळे, उपसरपंच भगवान शिद, मनोहर सुटे, नामदेव वाघमारे, सचिन भोसले, राजेंद्र कोकळे, सुरेश वाघमारे, दत्ता पवार, संतोष वाघमारे, योगेश वाघमारे, अशोक पवार आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चलचित्रातून गडकिल्ल्यांच्या संवर्धनाचे महत्व

## ● दिवीपारंगीमधील मिलींद घरत यांचा स्तुत्य उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या संघर्षातून गड किल्ल्यांची निर्मिती केली. या गड किल्ल्यांचा इतिहास, त्यांचे संवर्धन व जतन करण्याची मानसिकता निर्माण व्हावी, यासाठी दिवीपारंगी येथील मिलींद परशुराम घरत यांनी साकारलेल्या चलचित्रातून गडकिल्ल्यांचे संवर्धनाचे महत्व पटवून दिले आहे.

बाप्पाच्या स्वागतासाठी अनेकांनी घरोघरी वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक आरस तयार केल्या आहेत. काहींनी गणरायाच्या मुर्तीसमोर समाजहिताच्या दृष्टीने चलचित्र व देखावे तयार केले आहेत. काहींनी गावाकडे चला, स्वच्छता राखा तर काहींनी पर्यावरणाचा समतोल राखण्याचा संदेश चलचित्रद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे. अलिबाग तालुक्यातील दिवीपारंगी येथील मिलींद घरत हे गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सवात विविध देखावे व चलचित्र तयार करून समाजप्रबोधनाचे काम करीत आहेत. मागील वर्षी त्यांनी देखाव्यातून स्वच्छतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला होता. ग्रामीण भागासह शहरी भागातील सार्वजनिक ठिकाणांच्या भिंतीवर आकर्षक भित्तीचित्रे काढण्याचा देखावा त्यांनी सादर केला होता. माझी वसुंधरा अभियानांतर्गत कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी घरातील उरलेले खाद्य पदार्थ, खरकटे अन्न, ओला कचरा व शेणापासून बायोगॅस व कंपोस्ट खत तयार करण्याचा देखावा त्यांनी तयार केला होता. यावर्षी गड किल्ल्यांचे महत्व पटवून देण्यासाठी गडकिल्ले संवर्धन व किल्ले जोड महामार्ग प्रकल्प चलचित्र देखावा तयार केला आहे. गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकांनी योगदान दिले पाहिजे, याची जाणीव चलचित्रद्वारे करून दिली आहे.



### किल्ले जोड प्रकल्प राबवण्याची मागणी

युनेस्कोच्या यादीत गडकिल्ल्यांना स्थान मिळाले आहे. देश विदेशातील शिवभक्तांसह पर्यटकांमध्ये वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे प्रत्येक गडकिल्ल्यांकडे जाणारे रस्ते, रुंद, स्वच्छ व खड्डेमुक्त करावेत. अर्ध्यापेक्षा अधिक किल्ल्यांकडे जाणारे मार्ग कोकणातून आहेत. परंतु, कोकणातील रस्ते व पुल जिर्णावस्थेत आहेत. काही पुलांवरून वाहतूक बंद करण्यात आली आहे. महामार्ग रस्ते, दुरुस्तीसाठी विशेष निधी शासनाने मंजूर करून किल्ले जोड प्रकल्प राबवण्यात यावे, अशी मागणी या चलचित्रातून करण्यात आली आहे.

# अलिबागच्या बांधवांचा आंदोलकांना मदतीचा हात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदान येथे सुरू केलेल्या उपोषणाला संपूर्ण महाराष्ट्रातून पाठिंबा मिळत आहे. या लढ्यात सहभागी झालेल्या बांधवांना मदत करण्यासाठी अलिबाग तालुक्यातील मराठा समाजानेही पुढाकार घेतला आहे. सकल मराठा समाज, अलिबाग यांच्यावतीने मुंबईतील आंदोलनस्थळी अन्नधान्य आणि इतर आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी अलिबाग तालुक्यातील अनेक तरुण मराठा बांधव पुढे आले. त्यांनी केवळ मदतीची वस्तू दिली नाही, तर त्यामागे असलेली सामाजिक बांधिलकीची भावनाही जपली. वेश्वी विभागातून समरेश शेळके, वैभव गोळे, विशाल जाधव, विक्रांत जाधव आणि वरद पवार यांनी तर चोंढी विभागातून जितेंद्र जरंडे, राम कदम, प्रसन्न सुर्वे, किसान गायकवाड, ओमकार आमले, मनीष निर्गुण, सागर तरंगे यांनी या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. तसेच पोयनाड विभागातून सुधीर जाधव, सुमित माने, किरण सावंत, नवीन शिर्के, कमलाकर चव्हाण, किरण चव्हाण आणि संदेश शिंदे यांनीही या मदतकार्यात मोलाची कामगिरी बजावली.



या बांधवांनी स्वतः आझाद मैदान परिसरात जाऊन प्रत्येक आंदोलनकर्त्याला वैयक्तिकरित्या मदत पोहोचवली. यामध्ये तांदूळ, चणा डाळ, मूग डाळ, हळद, मसाला, हिंग, पोहे, फरसाण, बिस्किटे, पाणी आणि कांदे यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा समावेश होता. या मदतीमुळे मुंबईत तळ ठोकून बसलेल्या मराठा बांधवांना मोठा आधार मिळाला. अलिबागच्या मराठा समाजाच्या या कृतीमुळे केवळ आंदोलनकर्त्यांनाच बळ मिळाले नाही, तर मराठा समाजातील ऐक्य आणि संघर्षाची वृत्ती पुन्हा एकदा दिसून आली आहे.

# चिरनेर येथे कोसळले घर

**चिरनेर** : उरण तालुक्यातील चिरनेर मुळ पाडा येथील अविनाश ठाकूर यांचे वडिलोपार्जित घर मंगळवारी (दि.२) दुपारच्या सुमारास भर पावसात कोसळले. या घरात भाड्याने राहणारे रंजीत भास्कर पाटील हे कुटुंबीयांसोबत बाहेर गेले होते. त्यामुळे सुदैवाने जीवित हानी टळली. या घटनेची माहिती मिळताच सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच अरुण पाटील, सचिन घबाडी व संजय पाटील यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तसेच, या घटनेची माहिती चिरनेरच्या तलाठ्यांनाही देण्यात आली आहे. घरातील कपडे, भांडी, तांदूळ, कडधान्य तसेच इतर वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या कोसळलेल्या घराचा पंचनामा करून लवकरात लवकर योग्य ती नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अविनाश ठाकूर व संकेत ठाकूर या बंधूंनी केली आहे.

# 'एक गाव, एक गणेशोत्सव'

**। रोहा । प्रतिनिधी ।**

डोंगराच्या कुशीत आणि कुंडलिका नदीच्या तिरावर वसलेले निसर्गरम्य रोहे या गावाने 'एक गाव, एक गणेशोत्सव' या माध्यमातून जनतेसमोर एक आदर्श उभा केला आहे. पू.कृ. जोशी उर्फ दादा जोशी मास्तर यांच्या पुढाकाराने व सर्व रोहेकर नागरिकांच्या सहकार्याने १९०२ साली रोह्यात सार्वजनिक गणेशोत्सव सुरु झाला. त्यानंतर १९१२ साली हा उत्सव बंद पडला होता. पुढे १९२१ साली कै. द.वि. गांगल यांनी हा बंद पडलेला उत्सव पुन्हा सुरू केला. गेली १०४ वर्षे भाटे वाचनालयात हा उत्सव साजरा केला जातो. रोह्याच्या विविध आळ्यांमधील लोकांचा सहभाग वाढल्यामुळे रोह्याचा सार्वजनिक गणेशोत्सव खऱ्या अर्थाने प्रत्येक रोहेकर नागरिकांच्या आत्मीयतेचा व जिव्हाळ्याचा विषय झाला आहे.



### चलचित्रातून महत्त्वपूर्ण संदेश

पाणी हरवलं या शीर्षकाखाली तयार केलेल्या चलचित्रामधून समाजामध्ये अतिशय महत्वाचा व जागृती करणारा संदेश देण्यात आला आहे. पाणी ही जीवनाची खरी शिदोरी आहे. त्याचे जतन करणे आणि योग्य ती पावले उचलून पाणी साठवणे ही आजची काळाची गरज आहे. सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहाच्यावतीने या वर्षी चलचित्राच्या माध्यमातून 'पाणी हरवलं...' हा संदेश समाजामध्ये पोहोचवण्याचा उपक्रम राबवला आहे.

पान १ वरून

## सरकार झुकले, मराठा जिंकले

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी पाच मागण्या केल्या होत्या. त्यावर मराठा उपसमितीकडून आठ प्रस्ताव जरांगे यांना देण्यात आले. हैदराबादच्या गॅझेटची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तसेच, उपसमितीने मसुद्यात ज्या गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत, त्यावर तातडीने जीआर काढण्यात येणार असल्याचा शब्द दिला आहे.

मराठा उपसमितीने मनोज जरांगे यांची भेट घेतली आणि मसुद्यामध्ये काय तरतूद केली आहे याची माहिती दिली. मराठा उपसमितीमध्ये अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री माणिकराव कोकाटे यांचा समावेश होता.

**मराठा आणि कुणबी एकच मागणीवर वेळ मागितला**

मनोज जरांगे यांनी या मागण्या मान्य केल्या तर त्यासंबंधी तातडीने जीआर काढतो आणि त्याची अंमलबजावणी करतो, असा शब्द मराठा उपसमितीने दिला. पण मराठा आणि कुणबी एकच आहेत, या मनोज जरांगे यांच्या मागणीवर तूर्तास निर्णय घेण्यात आला नाही. ही प्रक्रिया किचकट असल्याने त्याला एक-दोन महिन्यांचा वेळ द्या, अशी मागणी उपसमितीने केली आहे.

एकदा तुम्ही अंमलबजावणी आणि जीआर दिला तर ९ वाजता मुंबई खाली होईल. नाचत नाचत पोरं गावाकडे जातील. तुम्ही थांबा म्हटलं तरी थांबणार नाही. तुम्ही जीआर द्या. आम्ही तुमच्या स्वागताला तयार राहू. जिंकलो रे राजे हो आपण, तुमच्या ताकदीवर. आज कळालं गरिबांची ताकद किती मोठी आहे, अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

## मराठा आंदोलकांना मारहाण

केला आहे. पुण्याच्या आंबेगाव तालुक्यातील काही मराठा तरुण रविवारी दुपारी पिकअप वाहनाने जुन्या मुंबई-पुणे महामार्गाने मुंबईच्या दिशेने जात होते. ही गाडी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास पनवेलमधील डेरवली पुलाच्या जवळ आली असताना, त्यापुढील लाल रंगाच्या कारला घासली गेली. यावरून कारचालक आणि मराठा तरुणांमध्ये वाद होऊन भांडण झाले. त्यानंतर त्यांच्यात हाणामारी झाली. या गोष्टीचा राग मनात धरून कारचालकाने फोन करून त्याच्या सहकाऱ्यांना बोलावून घेतले. त्यानंतर आरोपी कारचालकाने जेएनपीटीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील टी पॉइंटच्या पुढे पुष्पकनगर समोरील पहिल्या पुलाजवळ मराठा तरुणांचे वाहन अडवले.

त्यानंतर आरोपी कारचालक व त्याच्या साथीदारांनी चंद्रकांत बाबाजी थोरांधळे, शाम बबन केमगिरे, गणेश ज्ञानेश्वर मिंडे, रामदास पिंगळे, सुधाकर ढवळे या तरुणांना हाताबुक्क्यांनी तसेच टिकावच्या लाकडी दांडक्याने व फायबर काठीने मारहाण करून जखमी केले. जखमी तरुणांनी पनवेल शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी जखमींना रुग्णालयात उपचारासाठी पाठवून देत, गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी मारेकऱ्यांचा शोध घेऊन त्यापैकी पाच जणांना अटक केली.

## आज शेकाप पदाधिकारी बैठक

चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे आदी प्रमुख मंडळी मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हा चिटणीस मंडळासह जिल्ह्यातील व तालुक्यातील विविध आघाड्यांच्या पदाधिकारी,सदस्यांच्या बैठकीत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली जाणार आहे.

या बैठकीत पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच पक्ष वाढीबाबत चर्चा केली जाणार आहे. तसेच, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन करून शेकापची असलेली भूमिका स्पष्ट केली जाणार आहे. शेकापच्या जिल्हा व तालुका स्तरावरील विविध आघाड्यांच्या कामकाजांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा व तालुका चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, विविध आघाड्याच पदाधिकारी, सभासद यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे, असे आवाहन शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केले आहे.

## रायगडकरांना आशा, गोगावलेंची निराशा?

दरम्यान, महायुतीमध्ये रायगडच्या पालकमंत्रिपदावरुन शिवसेना आणि राष्ट्रवादी आमने-सामने आहे. यासंदर्भात शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकाही झाल्या आहेत. मात्र, अद्यापही यावर तोडगा निघालेला नाही. काही दिवसांपूर्वी १५ ऑगस्ट रोजी रायगडच्या ध्वजारोहणाचा मान आदिती तटकरे यांना मिळाला होता. त्यावेळीही भरत गोगावले यांनी जाहीरपणे नाराजी उघड केली होती. तर, आता मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर जेव्हा तोडगा निघेल, त्यानंतर रायगडच्या पालकमंत्रिपदावरही निघेल, असे म्हणत गोगवले यांनी मिश्कील टिपण्णी केली आहे.

## आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न

परंतु, समायोजनचे गाजर दाखवत ही प्रक्रीया थांबविण्यात आली. परिपत्रक काढून एक वर्षे होत आले तरीदेखील समायोजन केले नसल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांनी १९ऑगस्टपासून बेमुदत संप सुरु केला. संप सुरु होऊन पंधरा दिवस होत आली आहेत. मात्र, प्रशासनासह सरकारकडून कोणतीही दखल घेण्यात आली नाही.

आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपाचा फटका ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवेवर होऊ लागला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा परिषद आरोग्य विभागात काम करणाऱ्या नियमीत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडला आहे. त्यामुळे आरोग्य सेवा वेळेवर पुरवताना या कर्मचाऱ्यांची दमछाक होत आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून सुरु असलेला कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप मोडीत काढण्यासाठी प्रशासनाकडून हालचाली सुरु झाल्या आहेत. जिल्हा आरोग्य प्रशासनासह आयुक्तांनी कारवाईचा बडगा सुरु केला आहे. संपात सहभागी होणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. कामावर हजर व्हा, अन्यथा वेतन थकविले जाईल. तुमच्या विरोधात कारवाई केली जाईल, असे सांगण्यात आले असल्याचे आंदोलक म्हणाले. वेगवेगळ्या पद्धतीने कर्मचाऱ्यांचा संप रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतू, हा लढा न्याय मिळेपर्यंत सुरु राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

## बसस्थानकाचे उद्घाटन

दिलीप पाटील, राम पाटील, निलेश पाटील, अशोक पाटील, जयेश पाटील, उदय पाटील, सूरज पाटील, विद्याधर पाटील, गणेश पाटील, राकेश पाटील, मनोज पाटील, गणेश धसाडे, प्रभाकर धसाडे, अमोल पाटील, मुरलीधर पाटील, प्रेमजी पाटील, प्रकाश पाटील, केतन धसाडे, भावेश पाटील, संदीप पेंटर, वसंत पाटील, पद्माकर पाटील, मंगला पाटील, वैशाली पाटील, कंगना पाटील, दयवंती पाटील, पायल धसाडे, वैष्णवी पाटील, धनश्री पाटील, वैशाली पाटील, ग्रामपंचायत माजी सदस्य विवेक पाटील आणि दिपक पाटील तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या. यापुढे मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, शेकापचे दिवंगत नेते प्रभाकर नारायण पाटील आणि ॲड दत्ता पाटील यांनी तालुक्यात शिक्षण आणि नोकऱ्या दिल्या असून हे काम आणि विकास पुढे सुरु असल्याचे देखील प्रतिपादन यावेळी चित्रलेखा पाटील यांनी केले.

या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाधान पाटील यांनी केले. तसेच, चित्रलेखा पाटील यांनी उभारलेल्या बस स्थानकामुळे गेले ३० ते ३५ वर्ष जांभुळपाडा गावांतील विद्यार्थी महिला, पुरुष, वृद्ध आणि कामगारांची समस्या दूर केल्याचे सांगत आभार मानले. आपले मत व्यक्त केले. त्यानंतर चित्रलेखा पाटील यांनी गावासाठी बांधण्यात आलेल्या विसर्जन घाटाला भेट दिली व पहाणी केली.

## बाप्पासह गौराईला निरोप

या कालावधीत दिवसरात्र वेगवेगळे कार्यक्रम घेऊन बाप्पासह गौराईची सेवा करण्यात आले. आरती, भजनासह पारंपारिक नृत्याने शहरी भागासह ग्रामीण भाग बहरून गेला होता. सात दिवसांच्या पाहूणचारानंतर मंगळवारी (दि.२) दुपारनंतर गौराईसह बाप्पाला निरोप देण्याची वेळ सुरु झाली. संध्याकाळची आरती झाल्यानंतर गावागावातून मिरवणूकीला सुरुवात झाली. काही ठिकाणी बेंजोसह काही ठिकाणी डिजे, स्पीकर अशा अनेक वाद्यांच्या तालावर मिरवणूक काढण्यात आली. काही ठिकाणी गणपतीच्या गाणी तर काही ठिकाणी मराठी, हिंदी गाण्यांच्या ठेक्यावर नाचत अनेकांनी मिरवणूकीत सहभाग घेतला. त्यासोबत भजनांचा जल्लोषही दिसून आला. काही ठिकाणी पारंपारिक पध्दतीने डोक्यावर तर काही ठिकाणी कार, रिक्षा, हातगाडीवरून बाप्पाच्या मुर्तीची मिरवणूक विसर्जन स्थळापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत महिला, तरुण मंडळी, ज्येष्ठ नागरिक, आदी सर्वचजण नवनवीन कपडे परिधान करून आनंदोत्सवात सहभागी झाले होते. रंगबेरंगी फटाक्यांची आतषबाजी तसेच एक, दोन,तीन, चार गणपतीचा जयजयकार असा जयघोष करण्यात आला.

मिरवणूकीच्या दरम्यान पावसाने सुरुवात केली होती. परंतु, काही वेळ विश्रांती घेतल्याने भाविकांना थोडासा दिलासा मिळाला. ग्रामीण भागात काही ठिकाणी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास नदी, तलावांमध्ये गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात आले. तर काही ठिकाणी रात्री दहा नंतर विसर्जन केले. शहरी भागातदेखील रात्री बारा वाजेपर्यंत मुर्तीचे विसर्जन करून गणरायाला निरोप दिला. जिल्ह्यामध्ये ५६ हजार ४६८ गणेशमूर्ती व १६ हजार १७५ गौराईची मुर्तीचे विसर्जन तलाव, नदी, कृत्रिम तलाव व समुद्रात करण्यात आले. यावेळी भाविकांनी विसर्जन स्थळांवर अलोट गर्दी केली होती. दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी गर्दीच्या ठिकाणी पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला होता. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने दामीनी पथक, बीट मार्शल पथक व साध्या गणवेशातील पोलीस तैनात करण्यात आले होते.

**लहान मुर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात**

अलिबाग नगरपरिषदेबरोबरच जिल्ह्यातील २८ हून अधिक ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्यात आले होते. पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच पाण्याचे प्रदुषण रोखण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता. कृत्रिम तलावाच्या उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. अनेकांनी लहान मुर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात करून या उपक्रमात सहभाग घेतला.


(छायाचित्र : सुधीर नाझरे)

# जिल्ह्यात बाप्पाचे उत्साहात विसर्जन





## वाडगावमध्ये सामूहिक विसर्जनाची परंपरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव गावात गणेशोत्सवाची अनोखी पूर्वपरंपरागत परंपरा आजही जपली जात आहे. सात दिवसांच्या आनंद सोहळ्यानंतर सर्व गावकरी मोठ्या उत्साहाने आणि एकात्मतेने आपल्या बाप्पाचे विसर्जन करतात. प्रथम गावदेवीच्या पारावर सर्वजण एकत्र जमा होऊन सार्वजनिक आरती करतात. त्यानंतर ढोल ताशांच्या गजरात 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात भक्तिमय वातावरणात गावकरी एकदिलाने सहभागी होत गावच्या नदीकाठी बाप्पाला निरोप देतात. एकाच रांगेत जवळपास १०० गौरी गणपतींची विसर्जन मिरवणूक डोळ्यांचे पारणे फेडणारी असते. हि परंपरा गावात एकोपा, एकात्मता आणि सांस्कृतिक वारसा जपणारी असल्याने वाडगावच्या एकजुटीचे प्रतीक असल्याचे गावचे उपसरपंच जयेंद्र भगत यांनी सांगितले.

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील २,२९२ गणपती तर २५१ गौरींना मंगळवारी (दि.२) मंगलमय वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी नगरपरिषदेच्यावतीने नाक्या नाक्यावर रोषणाई करण्यात आली होती. तसेच, गणपती विसर्जन करण्यासाठी १० लाईफ गार्ड व प्राथमिक उपचारांची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी मुरुड पोलिसांच्यावतीने देखील चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर' या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

# चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटी सज्ज

## बुधवार, गुरूवार पाचशेहून अधिक एसटी बस

प्रमोद जाधव

**| रायगड |**

सात दिवसांच्या बाप्पाच्या विसर्जनानंतर चाकरमानी आता परतीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे चाकरमान्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची एसटी बस सज्ज झाली आहे. बुधवार व गुरुवार असे दोन दिवस पाचशेहून अधिक एसटी बसेस मुंबई, ठाणे, बोरीवली येथे जाण्यासाठी सोडल्या जाणार असल्याची माहिती विभाग नियंत्रक दिपक घोडे यांनी दिली.

बाप्पाचे आगमन बुधवारी (दि.२७) घरोघरी झाले. त्यामुळे गणेशोत्सव साजरा करण्यासाठी चाकमानी आपापल्या गावी दाखल झाले होते. आठ दिवसांच्या मनोभावे सेवेनंतर चाकरमानी बुधवार दि.३ पासून परतीच्या मार्गावर निघत आहेत. त्यामुळे गर्दी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुखकर व्हावा, म्हणून रायगडच्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विभागाने नियोजन केले आहे. गर्दीचा विचार करून ग्रुप बुकींग तसेच आरक्षण नोंदविलेले अशा अनेक प्रवाशांना त्यांच्या निश्चित स्थळी सुखरूप पोहचविण्यासाठी एसटी महामंडळाने तयारी केली आहे. बुधवारी (दि.३) जिल्ह्यातील बस स्थानकांत चाकरमान्यांच्या गर्दीनुसार ५२५ एसटी बसेस सोडण्यात येणार आहेत. काही चाकरमानी गुरुवारी (दि.४) देखील निघणार आहेत. त्यामुळे गुरूवारी दीडशे बसेस सोडल्या जाणार आहेत. त्यानुसार नियोजन करण्यात आले आहे.

### दुरुस्ती पथकाची नियुक्ती

बुधवारी व गुरुवारी चाकरमानी परतीच्या मार्गावर असणार आहेत. त्यांच्या सेवेसाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. यावेळी पाचशेहून अधिक बसेस सोडल्या जाणार आहेत. दरम्यान, एसटीमध्ये काही बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्तीची सेवादेखील उपलब्ध करण्यात आली आहे. एसटी महामंडळ रायगड विभागामार्फत जिल्ह्यात पाच ठिकाणी दुरुस्ती पथक नियुक्त केले आहे. खारपाडा, पेण, नागोठणे, कोलाड, महाड या भागांत हे पथक नेमण्यात आले आहे. या पथकामध्ये मॅकेनिक, पर्यवेक्षकांचा समावेश असणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# पर्यावरणपूरक बाप्पाचे विसर्जन

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**



सुधागड तालुका मराठा समाजाचे सरचिटणीस सुजित बारसकर मागील पाच वर्षांपासून सातत्याने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करत आहेत. यंदाही मंगळवारी (दि.२) त्यांनी शाडूच्या मातीपासून बनवलेल्या गणरायाचे विसर्जन आपल्या पालीतील घराच्या टेरेसवर कृत्रिम पाण्याच्या टाकीमध्ये केले. त्यांच्या या पर्यावरण पूरक व विधायक गणेशोत्सवाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी सुजित बारसकर यांनी सांगितले की, आम्ही दरवर्षी बाप्पाच्या शाडूच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करतो. सजावट ही पर्यावरणपूरक असते. जलप्रदूषण होणार नाही याची काळजी घेत विसर्जन घरातच करायचे ठरविले. त्यानुसार आम्ही टेरेसवर गणपतीचे विसर्जन केले. माती व निर्माल्य एकत्र करून त्यात शमीचे झाड लावणार आहोत. तसेच, आम्ही सलग पाचव्या वर्षी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यात यशस्वी झालो. अशाच प्रकारे दरवर्षी आम्ही गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्धार केला आहे, असे समृद्धी बारसकर यांनी सांगितले.

# 'पुढच्या वर्षी लवकर या...'

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात गौरी-गणपतींना मंगळवारी (दि.२) सायंकाळी श्रीवर्धनमधील समुद्रकिनाऱ्यावर भावपूर्ण निरोप देण्यात आला. या वेळेस प्रशासनाकडून योग्य उपाययोजना आखण्यात आल्या होत्या.

श्रीवर्धन येथील मठाचा गवंड, शासकीय विश्रामगृह रस्ता, खालचा जीवना व दांडा या मार्गावरून समुद्रकिनाऱ्यावर गौरी-गणपतींना भक्ती भावाने निरोप देण्यात आला. विसर्जनादरम्यान भजने व चौकाचौकात आरत्या घेण्यात आल्या. त्यांनतर गौरीं व गणपतींचे समुद्रात विसर्जन करण्यात आले. यावेळी श्रीवर्धन नगरपरिषदेकडून भाविकांच्या सुरक्षिततेसाठी किनाऱ्यावरील धोकादायक जागांवर लाल झेंडे लावून व ध्वनीक्षेपकावरून वारंवार सूचना करण्यात येत होत्या. तसेच, बंधाऱ्यांवर हॅलोजन दिवे लावण्यात आले होते. विसर्जन मार्गावरील नाक्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस तैनात करण्यात आले होते. यावेळी समुद्रकिनाऱ्यावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता प्रशासनाकडून योग्य खबरदारी घेण्यात आली होती.



# रसायनीत गौरी-गणपतींना भावपूर्ण निरोप



**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी व आसपासच्या परिसरातील गौरी-गणपतींचे मंगळवारी सायंकाळी भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले. परीसरातील पाताळगंगा नदी, मोहोपाडा तलाव, रिस पुल, कांबे गणेश घाट, वावेघर गणेश घाट, वाशिवली गणेश घाट, बारवई गणेश घाट आदी ठिकाणी भजने गावून शेकडो गणेशांचे व गौराईंचे विसर्जन करण्यात आले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता रसायनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली जागोजागी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरणात गौरी-गणपतींना निरोप देण्यात आला.

# वाजत गाजत बाप्पाचे विसर्जन

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील सात दिवसांच्या गौरी गणपतीचे विसर्जन मंगळवारी (दि.२) येथील गांधारी, काळ, नागेश्वरी व सावित्री नदी पात्रात करण्यात आले. या दरम्यान 'मोरया मोरया'चा गजर सर्वत्र घुमत होता. यावेळी तालुक्यातील १,८०५ गौरी, ३,४०७ घरगुती व २१ सार्वजनिक गणपतींचे पारंपारिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त देखील ठेवण्यात आला होता. टाळ, मुदुंगच्या स्वरात 'मोरया मोरया'च्या गजरात काहींनी गाडीतुन तर काहींनी हातात गणपती घेत नदी किनारी मार्गस्त झाले. तसेच, महिला वर्गाने गौरी हातात घेत विसर्जन घाट गाठले. वाजत गाजत विसर्जन स्थळी पोहोचून गौरी गणपतींना निरोप देण्यात आला.

# बाप्पाला भक्तिमय वातावरणात निरोप

**| नागोठणे | प्रतिनिधी |**



नागोठणे शहर व परिसरांतील १,०५३ खासगी गणपती, रिलायन्स टाऊनशीप, कातळावाडी व पिंपळवाडी येथील ३ सार्वजनिक गणपतींसह १३० गौरींना मंगळवारी (दि.२) भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी पावसाने विश्रांती घेतल्यामुळे नागोठणे शहर व परिसरातील ग्रामीण भागातील गणेश भक्तांनी अधिकाधिक जल्लोष आणि आनंद लुटला. नागोठणे शहर व परिसरातील सर्व विसर्जन स्थळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच उत्साहाच्या, आनंदाच्या क्षणी कोणताही गालबोट लागू नये, कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी नागोठण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# रोह्यात दंगल नियंत्रक पथक हजर

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यात सात दिवसांच्या ९०४ गणपतींसह आणि २९८ गौराईंचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. नाशिक बाजा, ढोल, ताशांच्या आणि टाळ, मृदुंगाच्या गजरात पुढच्या वर्षी लवकर या असे म्हणत भक्तगणांनी अवडत्या गणरायाला निरोप दिला. यावेळी शहरातील विसर्जन घाटावर भक्तांनी मोठी गर्दी झाली होती. विसर्जनाच्या दरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस फौज फाट्यासहित दंगल नियंत्रक पथक बंदोबस्तासाठी नेमण्यात आले होते.

**काळ, गोद नदीच्या पात्रात विसर्जन** | **बाप्पाच्या विसर्जनासाठी नगरपंचायंतीचे कर्मचारी**

# माणगावात पर्यावरण रक्षणाचा संदेश

**| माणगाव | प्रतिनिधी |**



माणगावसह तालुक्यातील पाच दिवसांचे सार्वजनिक व घरगुती गणपतींसह गौरींचे येथील काळ व गोद नदीच्या पात्रात उत्साहात व भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. यावेळी माणगाव पोलीस ठाण्यातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

तालुक्यात मंगळवारी (दि.२) दुपारी ३ वाजल्यापासून सायंकाळपर्यंत विसर्जन सुरू होते. काही गणेश भक्तांनी गाडीतून गणराय विसर्जनासाठी आणले. माणगाव येथील काळ नदी तसेच गोद नदी ठिकाणच्या गणपती विसर्जन घाटाजवळ नगरपंचायतीचे कामगार गणरायाचे विसर्जन करण्यासाठी तैनात ठेवण्यात आले होते.

नगरपंचायतीतर्फे शर्मिला सुर्वे, ज्ञानदेव पवार, आनंद यादव, हर्षदा काळे, महादेव कनोजे, रंणधीर कनोजे, विजय मेथा, मनिष मेथा, मुख्याधिकारी संतोष माळी, नगरसेवक व माणगाव पोलीस ठाण्यातर्फे आलेल्या सर्व गणरायांचे स्वागत करण्यात आले. विसर्जन ठिकाणी माणगाव नागरपंचायतीतर्फे गणेश भक्तांना पर्यावरण पूरक गणेशोत्सव अंतर्गत कृत्रिम विसर्जन तलावाचा उपयोग करून पर्यावरणाचे रक्षण करा, माझी वसुंधरा, स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत निर्माल्य येथे टाकावे, असा संदेश नगरपंचायतीचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष सर्व नगरसेवक, नगरसेविका, मुख्याधिकारी संतोष माळी व कर्मचारी वृंद यांच्यातर्फे देण्यात आला होता.




आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

**फोटोसाठी स्थानिक संपर्क**

सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६
जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/८१४९६६३८१३
संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९००
समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१
मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९
अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४
नंदकुमार मरवडे (खांब) : ८३०८६८८२२९
सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९
सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२
समीर रिसबुड (श्रीवर्धन): ९८८१९२२८३५
दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५
जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२
शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५
कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९
राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/८२३७१३८९७४
मुस्कान खान (पेण) : ८९२८९१११३९१
राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५
बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४
भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८
सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१
अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३
गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३
वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५
अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७
सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७
महेश पवार (नागोठणे) : ९२२५४७००३७

**स्पर्धेचे स्वरूप**

- आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
- स्पर्धा २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत घेतली जाईल.

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

# कोर्टाच्या पदराआडून

मराठा आंदोलन चिरडण्याची तयारी चालू आहे असे परवा आम्ही या स्तंभात म्हटले होते. ते मंगळवारी ठळकपणे समोर आले. जरांगे शुक्रवारी आंदोलनाला बसले. आज मंगळवारपर्यंत सरकारच्या एकाही मंत्र्याने त्यांची भेट घेतलेली नव्हती. मंगळवारी कोर्टाने आंदोलकांना रस्ते मोकळे करण्यास सांगितले आणि नंतर मंत्र्याचे शिष्टमंडळ आले. त्यानंतर जो काही तथाकथित तोडगा निघाला त्यावर आम्ही नंतर सविस्तर लिहूच. पण एकूण या प्रकरणात जनतेचा आंदोलनाचा हक्कच सरकारला अमान्य होता असे दिसले. देवेंद्र फडणवीस विचारत होते, चर्चा कोणाशी करायची. मनोज जरांगे उपोषणाला बसले होते. तेच या आंदोलनाचे कर्तेधर्ते व नेते होते. चर्चा त्यांच्याशीच करावी लागणार होती. चर्चा ही तर नंतरची गोष्ट. मुळात त्यांची भेट घेऊन चर्चेसाठी मार्ग तर तयार करावा होता. पण तो करण्याचे फडणवीस सरकारने मुद्दाम टाळले. मंत्रिमंडळातील मराठा उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील. जरांगे मुंबईत येण्याआधीच ते त्यांना भेटणार असल्याच्या बातम्या आल्या होत्या. पण नंतर बहुदा मुख्यमंत्र्यांनी कळ फिरवली असावी. कदाचित वरून अमित शाह यांचा निरोप आला असावा. कोणत्याही आंदोलनाला किंमत द्यायची नाही हे भाजपचे केंद्रीय धोरण आहे याची आठवण करून देण्यात आली असावी. दिल्लीतील शेतकऱ्यांचे आंदोलन दीड वर्षे चालू होते. पण मोदी किंवा शाह यांनी त्यांना भेट दिली नाही व रस्त्यात खिळे टाकून त्यांना अडवले. मुंबईतही हेच घडले. आंदोलकांना अन्नपाणी मिळू नये अशी व्यवस्था झाली. नंतर आंदोलकांना त्यांना हरतऱ्हेने बदनाम करण्याची मोहीम राबवली गेली. आंदोलक ठिकठिकाणी रस्ते अडवत आहेत, भर रस्त्यावर आंघोळी करत आहेत, कबड्डी वा कुस्ती खेळत आहेत असे व्हिडिओ दाखवले गेले. अर्धीअधिक जनता जिथे झोपड्यांमध्ये राहते व तिचे व्यवहार उघड्यावरच होत असतात तिथे तीसचाळीस हजार आंदोलकांच्या येण्याने विशेष फरक पडू शकत नाही. पण गहजब असा चालू होता की, कोण्या परकीय आक्रमकांनी मुंबईवर हल्ला केला आहे.

## कशाची लाज वाटते?

ही सर्व दूर मराठवाडा, खानदेश इत्यादी भागातून आलेली मंडळी होती. अनेक जण प्रथमच मुंबईत आले होते. तरीही ते शांततेने वागले. काही जणांनी थोडीफार मस्ती केली असेल. त्यांच्यावर कारवाई करायला पोलिसांना कोणीही रोखलेले नव्हते. पण अत्यंत किरकोळ अशा काही घटनांचा बाऊ करून आंदोलनाने मुंबईची वाट लावल्याचे जे चित्र तयार केले जात आहेत ते अत्यंत आक्षेपार्ह होते. प्रवीण दरेकर असे म्हणाले की, आंदोलक रस्त्यात आंघोळी करतात हे पाहून लाज वाटते. दरेकर किंवा त्यांच्यासारख्या नेत्यांची उठबस आता लोढा किंवा तत्सम बिल्डरांसोबत वाढली आहे. त्यांना आपल्याच भावांची आता लाज वाटू लागली आहे. याच रीतीने फडणवीसांचे कौतुक करणारा मिडिया आंदोलनाविषयी खोट्या बातम्या पसरवत होता. एकीकडे आंदोलनाची बाहेरून बदनामी करायची, जरांगेंशी थेट चर्चा करणे टाळायचे आणि नंतर हा प्रश्न न्यायालयात नेऊन कोर्टाच्या काठीने साप मारायचा असे फडणवीसांचे धोरण होते. त्यानुसार सोमवारी फडणवीसांचे पाळलेले हुजरे गुणवंत सदावर्ते न्यायालयात गेले. त्यांनी मुंबईकरांचे किती हाल चालू आहेत याचा पाढा वाचला. सरकारच्या वकिलांनी त्यांची री ओढली. दुर्दैवाने, आजकाल न्यायालयेही अनेकदा आंदोलने म्हणजे उपद्रव असेच समजतात. मध्यंतरी मुंबई उच्च न्यायालयाच्याच एका खंडपीठाने इस्रायलविरोधात मुंबईत आंदोलन कशासाठी असे म्हणून परवानगी नाकारली होती. हजारो मैलावरच्या लोकांसाठी तुम्ही कशाला बोलत आहात असे तारे त्या न्यायालयाने तोडले होते. मराठा आंदोलकांच्या सुनावणीच्या वेळीही न्यायालयाने असाच त्रास व्यक्त केला. आंदोलकांमुळे दक्षिण मुंबईतील रस्त्यांवर गर्दी वाढली व काही ठिकाणी वाहतूक रोखली गेली हे खरे होते. पण आंदोलन शांततेने चालू होते हे कोणीही नाकारू शकणार नाही. इथे कोणताही हिंसाचाराचा प्रकार घडलेला नव्हता. तरीही आंदोलन हाताबाहेर गेल्याची टिपण्णी केली गेली. रस्ते मोकळे करा असा आदेश सरकारला दिला गेला. सरकारला न्यायालयाच्या आडोशाने हेच करायचे होते.

## घटनात्मक हक्कांचा खून

सरकारची बाजू मांडणारे वकील न्यायालयाला म्हणाले की, आंदोलकांना हटवण्यासाठी सरकारने आदेश द्यावा. वास्तविक यात कोणताही गुन्हा किंवा कायद्याचे उल्लंघन झालेले नसताना सरकारला न्यायालयाच्या आदेशाची गरजच नाही. पण वस्तुस्थिती अशी आहे की, सरकारला हे आंदोलन दडपायचे आहे. पण ते थेट न करता त्यांना न्यायालयाच्या पदराआड लपून हे करण्यात आले. न्यायालयाने खरे तर त्यांना हा प्रश्न तुमचा तुम्ही सोडवायला हवा असे सांगून वाटेला लावायला हवे होते. ते झाले नाही. विशेष म्हणजे या सर्व काळात, न्यायालयाने सरकारला एकदाही हा प्रश्न केला नाही की, जरांगे किंवा आंदोलकांशी तुम्ही आतापर्यंत कितीवेळा चर्चा केली? जरांगे यांनी तीन महिन्यांपूर्वी आंदोलनाची नोटीस दिलेली होती. तरीही सरकारने त्यांच्याशी एकदाही संवाद साधण्याचा प्रयत्न केला नाही. जरांगे यांना मुंबईत येऊ दिले. आणि नंतर आंदोलनाची कोंडी केली गेली. नंतर एखादे गैरकृत्य झाले असते तर त्याचा आधार घेऊन पूर्ण आंदोलनच खलास करून टाकण्याची ही रणनीती होती. तिला पर्याय म्हणून न्यायालयाचा आधार घेतला जात आहे. मुळात आंदोलाचा अधिकार हा जनतेचा घटनात्मक अधिकार आहे. त्यावर सरकार वाटेल तशी बंधने घालू शकत नाही. कायदा सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ नये ही अट योग्य आहे. पण तसा धोका होत नसेल तर आंदोलन किती लोकांनी करावे, किती दिवस करावे हे सरकार किंवा न्यायालय यांनी सांगणे अपेक्षित नाही. पण आज नेमके तेच घडले. मुंबईतले आझाद मैदान हा आंदोलनासाठी निश्चित केलेला भाग आहे. असे असताना तिथेही आंदोलन करण्यावर बंदी घालायची हा सरळ सरळ घटनात्मक अधिकारांचा खून आहे. फडणवीस सरकारने गेल्या दहा वर्षात हे वारंवार केले आहे. २०१७ मध्ये एसटी कर्मचाऱ्यांनी ऐन दिवाळीत संप केला. त्यावेळी त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. नंतर चार दिवसांनी प्रकरण न्यायालयात जाईल अशी व्यवस्था झाली. तिथे हा संप बेकायदा ठरवण्यात आला. एसटी कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास खलास झाला. काहीही पदरात न पडता संप मागे घ्यावा लागला. आता एसटी मरणाच्या वाटेवर चालते आहे. २०२१ च्या जानेवारीत मुंबईतील बेस्ट सेवेच्या कामगारांनी नऊ दिवस संप केला. तिथेही त्यांच्या मागण्यांना सरकारने उडवून लावले. मात्र जनतेचे हाल चालू आहेत असे म्हणून न्यायालयात कांगावा केला. शेवटी त्यांनाही असाच संप मागे घ्यावा लागला. मराठा आंदोलनात नेमके काय झाले हे आजउद्या कळेलच.

विचार

# एआयच्या माध्यमातून सायबर गुन्हेगारी

***झटपट अर्थार्जनासाठी हल्ली काही अनुभवी संगणकतज्ज्ञ तंत्रज्ञानाचा दुरूपयोग करून, गुन्हे करण्याच्या नवनवीन युक्त्या शोधत सायबर गुन्हेगारीचा मार्ग पत्करत आहेत. त्यांना या बाबतीत काही तज्ज्ञ हॅकर्स आणि गुन्हेगार मार्गदर्शनही करत आहेत. संगणकप्रणाली 'हॅक' करून माहिती चोरण्याची विविध तंत्रे आज अस्तित्वात आहेत. आता यात भर पडली आहे कृत्रिम बुद्धिमत्तेची. ती कशी घातक ठरते? त्यापासून बचाव कसा करायचा?***



डॉ. दीपक शिकारपूर

एआय ही मानवी जीवनातील एक क्रांतिकारी शक्ती आहे, जी अनेक क्षेत्रांमध्ये बदल घडवून आणेल. तंत्रज्ञान हे एक शक्तिशाली साधन आहे. त्याचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी केला पाहिजे. झटपट अर्थार्जन करण्यासाठी काही अनुभवी संगणकतज्ज्ञ सायबर गुन्हेगारीचा मार्ग पत्करत आहेत. सायबर गुन्हेगार नवीन तंत्रज्ञानाचा दुरूपयोग करून गुन्हे करण्याच्या नवनवीन युक्त्या शोधतात. या बाबतीत ते कलाकारच असतात, फक्त आपल्या चातुर्याचा दुरुपयोग करतात. संगणकप्रणाली 'हॅक' करून माहिती चोरण्याची तर इतकी विविध तंत्रे आहेत की बस्स. त्यांना या बाबतीत काही तज्ज्ञ हॅकर्स आणि गुन्हेगार मार्गदर्शनही करत आहेत. आता यात भर पडली आहे कृत्रिम बुद्धिमत्तेची. सुरक्षिततेच्या दृष्टीने डिजिटल युग अत्यंत धोकादायक ठरत आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक सोयी उपलब्ध झाल्या असल्या, तरी त्याचबरोबर सायबर गुन्हेगारांनाही आधुनिक साधनांचा वापर करून गुन्हे करणे सोपे झाले आहे

सायबर गुन्हेगारी म्हणजे इंटरनेट, संगणक, मोबाइल किंवा इतर डिजिटल साधनांचा वापर करून कायद्याच्या विरोधात केले जाणारे कृत्य. यात फसवणूक, डेटा चोरी, बँकिंग घोटाळे, ओळख चोरी, खंडणीसाठी मालवेअर, बनावट वेबसाईट्स, सोशल मीडिया फसवणूक आदींचा समावेश होतो.

सायबर गुन्हेगार फिशिंग आणि स्पूफिंगसाठी एआयचा वापर करतात. एआय वापरून अगदी खरीखुरी वाटावीत अशा ईमेल्स, एसएमएस किंवा वेबसाइट्स तयार केल्या जातात. हे संदेश बँक, सरकारी संस्था किंवा प्रसिद्ध कंपन्यांच्या नावाने येतात. एआय आणि मशीन लर्निंग अल्गोरिदमचा वापर करून गुन्हेगार एखाद्या व्यक्तीच्या सोशल मीडिया प्रोफाइल, ईमेल आणि इतर ऑनलाइन माहितीचे विश्लेषण करतात. या माहितीच्या आधारे ते व्यक्तीच्या आवडीनिवडी, नोकरी आणि सामाजिक संबंधांनुसार अत्यंत विश्वसनीय फिशिंग ईमेल तयार करतात. उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या बँकेचे ग्राहक असाल तर तुम्हाला त्याच बँकेसारखा दिसणारा ईमेल येऊ शकतो. उदाहरणार्थ 'आपले बँक खाते बंद होणार आहे. कृपया लगेच लॉगिन करा' असा संदेश येणे. त्यातील लिंकवर क्लिक करताच बनावट वेबसाइटवर वापरकर्त्याचे लॉगिन व पासवर्ड घेतले जातात. एआय अर्थात कृत्रिम प्रज्ञेच्या मदतीने अशा संदेशांची भाषाशैली, लोगो, लेआउट हे सर्व खरे वाटावे असे तयार केले जाते. हल्ली बरेचदा डीपफेक तंत्रज्ञानाचाही वापर केला जातो. डीपफेक म्हणजे एआयच्या सहाय्याने बनवलेले बनावट व्हिडिओ किंवा ऑडिओ क्लिप्स. उदाहरणार्थ कंपनीच्या सीईओचा बनावट व्हिडिओ तयार करून कर्मचाऱ्यांना पैसे दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर करायला सांगणे किंवा एखाद्या व्यक्तीचा आवाज वापरून त्याच्या नातेवाइकांना फसवणे. यासाठी डेटा विश्लेषण करुन लक्ष्य निवडले जाते. एआयच्या मदतीने सोशल मीडिया, वेबसाईट्स, ॲप्सवरून लोकांचा वैयक्तिक डेटा गोळा केला जातो. यासाठी एआय मदत करते.

सर्वसाधारणत: ऑनलाइन कोण जास्त सक्रिय असतात, कोण आर्थिकदृष्ट्या सक्षम वाटतात, कोण सोशल इंजिनीअरिंगला बळी पडण्याची शक्यता जास्त आहे याबाबत एआय सोशल मीडिया प्रोफाइल विश्लेषण करून संभाव्य सावज शोधून देते. एआय आधारित बॉट्स वापरूनही मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली जाते. उदाहरणार्थ हजारो फेक अकाउंट्स तयार करणे, सोशल मीडियावर बनावट प्रचार करणे. एका क्षणात हजारो फिशिंग ईमेल्स पाठवणे असे प्रकार केले जातात. बरेचदा रॅन्समवेअर वापरले जाते. हे एक प्रकारचे मालवेअर असते. ते संगणकातील संपूर्ण डेटा गायब (डिलीट) करून टाकते. यानंतर डेटा परत मिळवण्यासाठी पैसे मागितले जातात. व्हॉइस स्कॅम्स हा फसवणुकीचा आणखी एक हुकमी प्रकार. एआय च्या मदतीने कोणाच्याही आवाजाची हुबेहुब नक्कल केली जाऊ शकते. उदाहरणार्थ एखाद्याच्या आईचा आवाज वापरून 'मी अडचणीत आहे, पैसे पाठव' असे सांगणारा कॉल करणे. या पध्दतीने पैसे वसूल केले जाऊ शकतात. ओळख चोरी हा असाच एक प्रकार. डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगार मंडळी बनावट ओळखपत्रे, जसे की आधार कार्ड किंवा पॅन कार्ड तयार करू शकतात. यामुळे आर्थिक सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. अलिकडे तर तंत्रज्ञानाची झेप स्वयंचलित हल्ल्यांपर्यंतही गेली आहे. मशीन लर्निंगचा वापर करून सायबर गुन्हेगार स्वयंचलित हल्ले करू शकतात, जे मानवी हस्तक्षेपाशिवाय चालतात. पासवर्ड क्रॅकिंग आणि क्रिप्टोग्राफीचा गैरवापर करुनही फसवणुकीचे प्रकार अंमलात आणले जातात. पारंपारिक पद्धतीने पासवर्ड क्रॅक करण्यासाठी खूप वेळ लागतो. पण, एआयमुळे हे काम खूप सोपे झाले आहे.

फसवणुकीच्या शृंखलेतील ताजा प्रकार म्हणजे अनुमानित पासवर्ड हल्ला. अल्गोरिदम मोठ्या प्रमाणात लीक झालेल्या पासवर्ड डेटाबेसचे विश्लेषण करतात आणि वापरकर्ते सामान्यतः कोणते पासवर्ड वापरतात याचा अंदाज घेतात. यामुळे ते पासवर्ड क्रॅक करण्यासाठी संभाव्य कॉम्बिनेशन्स तयार करतात आणि मोठ्या प्रमाणात हल्ले करतात. स्टेगानोग्राफी हे तंत्रज्ञान एका फाईलमध्ये दुसरी फाईल लपवण्याचे काम करते. सायबर गुन्हेगार एआयचा वापर करून मालवेअर किंवा गोपनीय डेटा फोटो किंवा ऑडिओ फाईलमध्ये लपवतात. यामुळे तो सामान्य तपासणीत सापडत नाही. यामुळे सायबर गुन्ह्यांशी लढण्यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक ठरते. सायबर गुन्हेगार एआयचा वापर करत असले तरी, त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्याशी लढता येते. एआयआधारित सुरक्षा प्रणाली हा एक महत्वाचा उपाय. सायबर सुरक्षा कंपन्या आता एआय सक्षम सुरक्षा प्रणाली विकसित करत आहेत, ज्या संशयास्पद वर्तन ओळखतात आणि धोक्यांचा अंदाज घेतात. या प्रणाली स्वयंचलितपणे धोके रोखतात. सायबर जागरूकता हा आणखी एक महत्वाचा मार्ग. एआय आधारित फसवणुकीपासून वाचण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. अनोळखी कॉल, ईमेल किंवा संदेशांवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. मजबूत सायबर सुरक्षा धोरण आखणे हा आणखी एक महत्वाचा उपाय आहे. कंपन्यांनी मजबूत सायबर सुरक्षा धोरणे, जसे की मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन आणि नियमित सुरक्षा ऑडिट्स लागू करणे महत्त्वाचे ठरते.

सायबर गुन्हेगारी ही एक झपाट्याने वाढणारी आणि अत्यंत गुंतागुंतीची समस्या आहे. एआय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग जसा सकारात्मक कामांसाठी होतो, तसाच गुन्हेगारही त्याचा गैरवापर करत आहेत. सावज निवडण्यासाठी आणि फसवणूक घडवून आणण्यासाठी हे तंत्रज्ञान प्रभावी ठरते. म्हणूनच समाजातील प्रत्येकाने डिजिटल साक्षरता आत्मसात करणे, सावधगिरी बाळगणे आणि तंत्रज्ञानाचे भान ठेवणे आवश्यक आहे. यामुळेच आपण स्वतःला आणि इतरांनाही सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित ठेवू शकतो. त्यासाठीच शाळा महाविद्यालयांमध्येही संगणक/स्मार्टफोनचे दुष्परिणाम या विषयावर प्रबोधन होणे बंधनकारक व्हायला हवे. नागरिकशास्त्र या विषयात या तंत्राचा समावेश व्हायची हीच वेळ आहे.

आधुनिक तंत्रज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे सायबर संस्कार. सायबर संस्कार प्रशिक्षणात स्मार्टफोनचा हुकमी वापर, सोशल मीडियावर सावधपणे माहिती पोस्ट करणे, मर्यादित सेल्फी, योग्य चलत चित्रण, सायबर गुन्हेगारी, स्वतःला सायबर सुरक्षित ठेवण्याचे उपाय, सायबर कायदे आणि गुन्हेगारांना झालेल्या शिक्षा याबाबत रितसर प्रशिक्षण देणे ही काळाची गरज बनली आहे. पूर्वी सुरक्षा ही फक्त भौतिक गोष्टींची गणली जायची. आता सर्व संगणकीय भांडवलाची आणि माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब बनली आहे. कुंपण, पहारेकरी, कड्या कुलूप, तिजोरी, शिस्त हे सर्व पर्याय पारंपारिक भौतिक जगातील व्यवसायांसाठी ठीक आहेत, पण डिजिटल युगात ते कुचकामी ठरतात. त्यासाठी वेगळे सायबर नियम अत्यावश्यक आहेत.

deepak@deepakshikarpur.com
**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

चर्चा आजची

# अद्ययावत स्थानकाचे स्वप्न कधी पुर्ण होणार



प्रमोद जाधव

अलिबाग एसटी बसच्या बिघाडाबरोबरच स्थानकात पडलेले खड्डे प्रवाशांना कायमच त्रासदायक ठरत आहे. स्थानकात बसण्यासाठी सुसज्ज आसन व्यवस्थेचा प्रश्नही कायम आहे. त्यामुळे अलिबागकरांना अद्ययावत अशा बस स्थानकाची प्रतिक्षा लागून राहिली आहे. मागील पाच वर्षापुर्वी भूमीपूजन केलेल्या स्थानकाच्या कामाला मुहूर्त कधी लागणार असा सवाल नागरिकांसह प्रवासी वर्गाकडून उपस्थित केला जात आहे.

अलिबाग हे पर्यटनादृष्टीने आणि ऐतिहासिक दृष्टया महत्वाचे ठिकाण आहे. अलिबागमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयापासून पोलीस अधीक्षक, जिल्हा नियोजन, जिल्हा परिषद अशी अनेक जिल्हा कार्यालये असून उपविभागीय अधिकारी कार्यालये, तहसील कार्यालयापासून जिल्हा सामान्य रुग्णालय, पंचायत समिती अशी अनेक कार्यालये आहेत. वेगवेगळी लहान मोठी खासगी कार्यालये, शाळा, महाविद्यालये आहेत. त्यामुळे नोकरी व्यवसायाबरोबरच शिक्षणासाठी हे ठिकाण महत्वाचे मानले जाते. अलिबागमध्ये वर्षाला दोन लाखहून अधिक पर्यटक भेटी देतात. शनिवार व रविवारी सुट्टीबरोबरच इतर सुट्ट्याच्या दिवशी अलिबाग पर्यटकांनी बहरून जातो. अलिबाग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी गेल्या ४० वर्षापासून अधिक जूने एसटी बस स्थानक आहे. अलिबाग एसटी बस आगारात ५४ हून अधिक एसटी बसेस आहेत. अडीचशेहून अधिक कर्मचारी आहेत. त्यात चालक व वाहकांची संख्या दीडशेहून अधिक आहे. एसटीला महिन्याला आठ लाखाहून अधिक उत्पन्न मिळते. लाखो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. प्रवासी संख्या वाढावी म्हणून एसटी महामंडळाकडून वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. डिझेलवर चालणाऱ्या बसच्या जागी सीएनजीवर चालणाऱ्या बस वापरल्या जात आहेत. प्रवाशांना आरामदायी प्रवास करता यावा, म्हणून वातानुकुलित वाहनांचा समावेश अधिक केला आहे. त्यामध्ये शिवशाही बसचादेखील समावेश आहे.

अलिबाग एसटी बस स्थानक ४० वर्षाहून अधिक जूने आहे. प्रवासी, व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जीर्ण झालेल्या अलिबाग बस स्थानकाच्या जागी नवीन एसटी बस स्थानक बांधण्याचा निर्णय त्यावेळी सरकारने घेतला होता. तत्कालीन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या थाटामाटात २८ ऑगस्ट २०१८ रोजी नवीन स्थानकाच्या कामाचे भूमीपूजन झाले होते. कामाची हालचालही सुरु झाली.स्थानकातील माती परीक्षण पुणे येथील डिरोक्ट्रीक इंजिनिअरिंग या कंपनीकडून २०१९ मध्ये करून नुतन इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला होता. या प्रकल्पासाठी सहा कोटी २८ लाख रुपये खर्च अपेक्षीत होते. ७ हजार ६३० चौरस फुट इतक्या क्षेत्रावर नवीन स्थानकाचे बांधकाम करण्यात येणार होते. तळ मजला व पहिला मजला अशा पध्दतीने बस स्थानकामध्ये इमारत होणार होती. स्थानकातील तळ मजल्यामध्ये १४ फलाट आहेत. प्रवाशांसाठी खास प्रतिक्षालय, उपहारगृह, प्रसाधनगृह, पार्सल खोली, महिलांसाठी हिरकणी कक्ष, आरक्षण कक्ष, स्थानक प्रमुख कार्यालय असणार होते. पहिल्या मजल्यावर चालक व वाहकांसाठी विश्रांती कक्ष बांधण्यात येणार होते. त्यामध्ये महिला व पुरुषांसाठी वेगळे कक्ष असणार होते. सुमारे एक लाख प्रवासी ये- जा करण्याची क्षमता नव्या स्थानकात होती. १८ महिन्यात म्हणजे २१ सप्टेंबर २०२१ पर्यंत स्थानकाचे काम पुर्ण होणे गरजेचे होते. परंतु पाच वर्षे होऊनदेखील या स्थानकात साधी वीटही रचण्यात आली नाही. अलिबाग आगाराची अवस्था दयनीय आहे. सतत स्लॅब कोसळणे, कार्यालयात पाण शिरणे असे प्रकार घडत असल्याने कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. अलिबाग बस स्थानकातील आरक्षण केंद्रासह एसटी पास केंद्रात पावसाचे पाणी शिरते. हे कार्यालय जणू काही कोंडवाडाच वाढत आहे. या कार्यालयात मुबलक सुविधा नसल्याने कर्मचाऱ्यांना नाहक त्रास होत आहे. स्थानकात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढत आहे. त्यामुळे त्यांची विष्टा मलमुत्रांची दुर्गंधी कायमच येते. त्यामुळे अनेक जण नाक दाबून प्रवास करतात. स्थानकातील नियंत्रक कक्षाची अवस्था बिकट आहे. एसटी बसची वाट पहात बसणाऱ्या फलाटाची दुरावस्था झाली आहे. पावसाच्या कालावधीत प्रवाशांना बसण्याची योग्य जागाही मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे अलिबागकरांना सुसज्ज अशा स्थानिकाची प्रतिक्षा लागून राहिली आहे. हे स्वप्न लवकरच पुर्ण व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

लोकसंसद

# पुरी यात्रेची तीन पवित्र चाके आता संसदेच्या संकुलात




ओडिशाच्या संस्कृतीचे आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक असलेल्या भगवान श्री जगन्नाथाच्या रथयात्रेतील तीन पवित्र चाके संसदेच्या परिसरात एका मुख्य ठिकाणी बसविण्यात येणार असून या संदर्भातील श्री जगन्नाथ मंदिर समितीने सादर केलेला प्रस्ताव लोकसभा कार्यालयाने स्वीकारला असल्याचे श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाकडून (एसजीटीए) नुकतेच सांगण्यात आले. वार्षिक रथयात्रेत वापरल्या जाणाऱ्या भगवान श्री जगन्नाथांचा नंदीघोष, देवी सुभद्राचा दर्पदलन आणि भगवान बलभद्रांचा तलध्वज या तीन भव्य रथांमधून ही पवित्र चाके घेतली जाणार आहेत. प्रत्येक रथातील एक चाक दिल्लीला नेले जाणार आहे आणि ओडिशाच्या कालातीत संस्कृती आणि आध्यात्मिक वारशाचे चिरस्थायी प्रतीक म्हणून संसदेच्या आवारात ठेवले जाणार आहे. दरवर्षी या तीन दैवी भावंडांचे ४५ फूट उंच लाकडी रथ २०० हून अधिक कारागिरांकडून सुमारे दोन महिन्यांत बांधण्यात येतात आणि वार्षिक रथयात्रेनंतर ते वेगळे केले जातात. वेगळे केलेले रथाचे भाग गोदामात ठेवले जातात आणि त्यातील काही भागांचा आणि चाकांचा लिलाव केला जातो. ओडिशाच्याच नव्हे तर संपूर्ण भारतीय संस्कृतीचे आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक असलेल्या भगवान श्री जगन्नाथाच्या रथयात्रेतील तीन पवित्र चाके भारतीय लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेच्या संकुलात स्थानापन्न होणार असल्याने समस्त भाविकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# समाजसुधारक अनंत हरि गद्रे



अनंत हरि गद्रे हे वार्ताहर, लेखक, नाटककार व थोर समाजसुधारक होते. त्यांना नाटिका संप्रदायाचे प्रवर्तक मानले जाते. त्यांचा जन्म १६ ऑक्टोबर १८९० रोजी कोकणातल्या देवरूख या गावात झाला. अनंत हरी गद्रे शिक्षणासाठी पुण्यात आले. येथे त्यांचे शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन महाविद्यालय अशा नामवंत ठिकाणी झाले. राम गणेश गडकरी व श्री. म. माटे हे त्यांचे सहाध्यायी होते. अनंत हरी गद्रे नाट्यसृष्टीत येण्यापूर्वी मराठी रंगभूमी ही मोठ्या नाटकांची होती. तेव्हाचे नाटक पाच सात अंकांचे आणि रात्रभर चालणारे असे. लोकांना त्याची सवय झाली होती. दरम्यानच्या काळात तीन तासात भरपूर मनोरंजन करणारे बोलपट आले आणि लोक नाटके पहायच्याऐवजी सिनेमे पाहू लागले.

तशातच संगीत नाटकांत गाण्यांना दिलेल्या 'वन्समोअर'मुळे रेंगाळत चाललेल्या गाण्यांचाही लोकांना कंटाळा येऊ लागला. परिणामी मराठी रंगभूमी संकटात सापडली. अशा रंगभूमीच्या पडत्या काळात रंगभूमीला सावरण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यांपैकी अनंत हरी गद्रे हे एक होते. रात्रभर चालणाऱ्या नाटकांपेक्षा गद्रे यांनी एक, दीड ते तीन तासात संपणाऱ्या नाटिका लिहायला सुरुवात केली. त्यांच्या प्रेमदेवता या पहिल्या नाटिकेचा १ ऑगस्ट १९३० रोजी बालमोहन संगीत मंडळीने केलेला पहिला प्रयोग हा, या नाटिकेच्या वेगळेपणामुळे आणि त्याला लागणाऱ्या कमी वेळामुळे प्रेक्षकांना पसंत पडला. त्यांच्या नाटिकांचे प्रयोग 'नूतन संगीत मंडळी' आणि गद्रे यांनी स्थापित केलेली 'मुंबई नाटिका संगीत मंडळी' या अन्य नाट्यसंस्थाही करीत असत. गद्रे यांच्या कार्याला दिशा मिळाली, ती लोकमान्य टिळक मंडालेचा कारावास संपून १९१४ मध्ये पुण्यात परतले तेव्हापासून. टिळकांच्या राजकारणात त्यांना आपण मदत करावी असे त्यांना वाटू लागले. दरम्यान, चरितार्थासाठी त्यांनी सुगंधी द्रव्याचे एक दुकानही काढले होते. पत्रकारिता हे टिळकांचे राजकारण चालवण्याचे साधन होऊ शकते याचा साक्षात्कार त्यांना अच्युतराव बळवंतराव कोल्हटकर यांच्यामुळे झाला. अच्युतराव खंदे टिळकभक्त व हाडाचे पत्रकार. गद्रे यांनी अच्युतरावांना गुरुस्थानी मानले व 'संदेश'मधूनच पत्रकारितेचे धडे गिरवले. १९२२ मध्ये सुरू झालेल्या मौज या साप्ताहिकातील त्यांची संपादकीयेही लोकप्रिय झाली. १९३४ मध्ये सुरू केलेल्या 'निर्भीड' या आपल्या दुसऱ्या साप्ताहिकातून गद्रे यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार करीत स्पृश्यास्पृश्यता आणि केशवपनासारख्या वाईट चालींवर कडाडून टीका केली.

दलित आणि सवर्णांमधील सामाजिक दरी मिटवण्यासाठी 'झुणका-भाकर चळवळी'सारखे प्रयोग गद्रे यांनी केले. 'झुणका-भाकर' चळवळीमध्ये समाजाच्या सर्व थरांतील, सर्व जातींचे लोक एकत्र येऊन भोजन करीत असत. झुणका-भाकर सहभोजन आणि स्पृश्यास्पृश्य सत्यनारायण ही दोन तंत्रे त्यांनी त्यासाठी वापरली. सामाजिक क्षेत्रांत सहासन, सहभोजन, सहपूजन, सहवसन आणि सहबंधन (आंतरजातीय विवाह) या पंचशीलांचा पुरस्कार गद्रे यांनी केला. अशा द्रष्ट्या समाजसुधारकाचे ३ सप्टेंबर १९६७ रोजी निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ सप्टेंबर


१) श्रीम. शुभदा शरदचंद्र ठोसर अलिबाग, ३-९-१९४५
२) श्री. अनंत दत्तात्रेय लेले अलिबाग, ३-९-१९५२
३) श्रीम. सुनंदा रोहिदास झांबरे विद्यानगर, अलिबाग, ३-९-१९५


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## सुवर्णकण



नामस्मरण हे कर्मात्मक साधन नसून ते भावात्मक साधन आहे हे विसरले जाते.
**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## कुडाळमध्ये नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप

सिंधुदुर्ग :गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक ऐक्य, पर्यावरण संवर्धन आणि लोकजागृती यांचेही उत्तम माध्यम ठरू शकतो, याचे प्रत्यंतर रोटरी क्लब ऑफ कुडाळने दिले. कुडाळ बसस्थानक परिसरात तसेच बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या नागरिकांना दोनशे कापडी पिशव्यांचे वाटप करून ‘प्लास्टिकमुक्त पर्यावरणपूरक जीवनशैली’चा संदेश देण्यात आला. बाजारपेठा, बसस्थानके व इतर सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या पिशव्या वापरल्या जातात. त्याचा थेट परिणाम जमिनीच्या सुपिकतेवर, पाण्याच्या प्रवाहावर व पशुपक्ष्यांच्या आरोग्यावर होत असतो. या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब ऑफ कुडाळने नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांची जाणीव निर्माण करण्यासाठी हा अभिनव उपक्रम राबविला.

## रोहा-कोलाड मार्गावर मोकाट गुरांचा सुळसुळाट

**रोहा** : रोहा-कोलाड अंतर्गत राज्य मार्गावर मोकाट गुरांचा मोठ्या प्रमाणावर रस्त्याच्या मधोमध ठिय्या बसलेला आढळून येत आहे. ही मोकाट गुरे सैरभैर फिरत असल्याने प्रवासी वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीही निर्माण होताना दिसत आहे. तर वाहन चालकांच्या घाईगडबीत लहान मोठे अपघात झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. या प्रकारामुळे स्थानिक ग्रामस्थ,वाहन चालकांसह प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे अशा मोकाट गुरांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित प्रशासनाच्या माध्यमातून कडक पावले उचलून योग्य ती कारवाई करण्याची मागणी आता दैनंदिन प्रवास करणारे प्रवासी वर्ग व वाहनचालक वर्गाकडून होत आहे.

## गणेशभक्तांच्या परतीसाठी चिपळूण-पनवेल मेमू

**चिपळूण** : गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या गणेशभक्तांच्या परतीसाठी ३ आणि ४ सप्टेंबर रोजी चिपळूण-पनवेल अनारक्षित मेमू स्पेशल धावणार आहे. आठ डब्यांच्या मेमू स्पेशलमुळे गर्दीची तीव्रता कमी होण्यास मदत होणार आहे. ०११६०/०११५९ क्रमांकाची चिपळूण-पनवेल मेमू अनारक्षित स्पेशल ३ आणि ४ सप्टेंबर रोजी चिपळूणहून सकाळी ११ वाजून ५ मिनिटांनी सुटून सायंकाळी ४.१० वाजता पनवेलला पोहोचेल. परतीच्या प्रवासात पनवेलहून सायंकाळी ४.४० वाजता सुटून रात्री ९.५५वा. चिपळूणला पोहोचेल. स्पेशलला आंजनी, खेड, कळंबणीबुद्रुक, दिवाणखवटी, विन्हेरे, करंजाडी, सापे वामणे, वीर, गोरेगाव रोड, माणगाव, इंदापूर, कोलाड, रोहा, नागोठणे, कासू, पेण, जिते, आपटा, सोमाटणे स्थानकात थांबे देण्यात आले आहेत.

# ‘रस्ता नाही, तर मतदान नाही’

## • संभाजीनगर येथील ग्रामस्थांचा ठाम निर्णय

**| संगमेश्वर | प्रतिनिधी |**

**संगमेश्वरमधील संभाजीनगर येथील रस्ता पूर्णपणे खड्ड्यांनी भरलेला असल्याने स्थानिकांना तसेच, विद्यार्थ्यांसह शाळकरी मुले, रुग्ण, वयोवृद्ध यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे संभाजीनगर येथील ग्रामस्थांनी रस्त्याच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून निवेदने, अर्ज, निवेदनपत्रे देऊनही रस्ता दुरुस्तीकडे कोणतीही दखल घेतली जात नाही. त्यामुळे येत्या ग्रा. पं., पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा ठाम निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे.**



हा रस्ता पूर्णपणे खड्ड्यांनी भरलेला असल्याने स्थानिकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा, अवघ्या ५०० ते ६०० मीटर लांबीचा हा रस्ता आजही लाल मातीचा कच्चा रस्ता असून त्यात मोठे-मोठे खड्डे पडलेले आहेत. पावसात वाहून गेलेल्या दगडांमुळे रस्त्याची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. या मार्गावरून वाहनाने किंवा पायी जाणे म्हणजे अपघाताला आमंत्रणच ठरले आहे.

संभाजीनगरमध्ये सुमारे ५०० हून अधिक लोकवस्ती आहे. याच वस्तीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह असून येथे ५० ते ६० विद्यार्थी राहतात. या रस्त्याशिवाय अन्य पर्यायी मार्ग नसल्यामुळे विद्यार्थ्यांसह शाळकरी मुले, रुग्ण, वयोवृद्ध यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. संभाजीनगरमध्ये जवळपास ५०० मतदार आहेत. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी पक्षनेते व स्थानिक पुढारी रस्ता होईल, अशी आश्वासने देतात; मात्र गेल्या ५०-६० वर्षात प्रत्यक्षात कोणतेही काम झालेले नाही. यावर्षी गणेशोत्सवाच्या काळात पावसामुळे रस्त्यावरील परिस्थिती अधिकच बिकट केली आहे. गणेशमूर्तींचे विसर्जन करताना ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

### निवडणुकांवर बहिष्कार

याबाबत ग्रामस्थांनी एकमुखाने ठराव करून सांगितले आहे की, रस्ता पक्का झाल्याशिवाय कोणत्याही निवडणुकीत मतदान करणार नाही. शासनाकडून मिळणाऱ्या फुकट आश्वासनांना आता फसणार नाही. आगामी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जि.प. निवडणुकांवर बहिष्कार अटळ आहे. हा रस्ता तातडीने दुरुस्त झाला नाही, तर शासन आणि प्रशासनाविरोधात ग्रामस्थांचा रोष उफाळून येण्याची शक्यता आहे.



## अणुस्कुरा घाटात दरड कोसळली

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे कोकणाला पश्चिम महाराष्ट्राशी जोडणाऱ्या अणुस्कुरा घाटात मंगळवारी (दि.२) सकाळी साडेअकराच्या सुमारास दरड कोसळली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच राजापूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले. काहीवेळ घाटातून एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली होती, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने दरड हटवण्याचे काम तासाभरात सुरू करण्यात आले. त्यानंतर पोलिसांच्या सुचनेनुसार आणि स्थानिक लोकांच्या मदतीने प्रथम एकेरी वाहतूक सुरू केली.


# अमेरिकेत साकारला पुणेरी वाडा

## • उरणच्या प्रियांका पाटीलने जपली भारतीय संस्कृती

**| उरण | प्रतिनिधी |**

भेंडखळ येथील ॲड. प्रियांका धनंजय पाटील हिने अमेरिका येथील न्यू जर्सी येथे राहून आपली भारतीय संस्कृतीची जोपासना करून पर्यावरणपुरक पुणेरी वाड्याची आरास केली आहे. या पुणेरी वाड्याचे नाव चार्मोली वाडा असे देण्यात आले असून हे नाव चार जिवलग मित्रपरिवारापासून प्रेरित होऊन दिले आहे. पुणेरी वाड्याची सजावटीला जवळजवळ दोन महिने लागले असून चार मित्र व त्यांचे परिवार यांच्या श्रमांचे फळ आहे.

ही सजावट महाराष्ट्र राज्यातील रीती व परंपरा दर्शवणारे असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात घेऊन जाणारे आहे.



ही फक्त सजावट नसून कित्येक वर्षांचे नाते, प्रेम व देवापोटी समर्पण दाखविणारा पुणेरी वाडा आहे. या वाडयाच्या हृदयापाशी गणपती विराजमान झालेले आहेत. त्याभोवती स्वयंपाक घर असून त्यामध्ये पारंपरिक पद्धतीची पितळाची भांडी आहेत. तसेच त्यामध्ये पारंपरिक पोशाखामध्ये राहणारे लोक आहेत. लहान मुले संगीत वाद्य वाजवत आहेत व खेळत आहेत. त्यामध्ये तुलसी वृंदावन असून रांगोळीदेखील काढली आहे. तसेच पुणेरी पाटी लावली आहे जे सांगते की, बेल वाजविल्यावर थोडी वाट पहायला शिका, घरात माणसे राहतात स्पायडरमॅन नाही. चपला आणि शहाणपण दोन्ही बाहेर सोडावे. भारतीय असलेल्या ॲड. प्रियांका पाटील यांनी अमेरिका सारख्या प्रगत देशात गणेशोत्सव साजरा करून आपली भारतीय संस्कृती, विचार, परंपरा जपली आहे.

# पान टपरीवाल्याचा प्रामाणिकपणा

**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा हायवेवरील वाकण येथील पान टपरीचालक संतोष सोनी यांच्या टपरीवर एका ग्राहकाने काही वस्तू खरेदी केल्या आणि त्याने संतोष सोनी याला पैसे दिले. परंतु, तो ग्राहक पैशांचे पाकीट विसरून वाकण येथून सुकेली खिंड येथे आल्यानंतर पोलिसांना लायसन दाखविण्यासाठी गेला, मात्र पैशांचे पाकीट पान टपरी वाल्याकडे राहिले असल्याचे



त्याच्या लक्षात आले. तो ग्राहक परत वाकण येथे आला असता ते पाकीट पान टपरीवाल्याने जपून ठेवल्याचे समझले.

ग्राहकाचे नाव उल्हास मदन साळगांवकर दापोली (रत्नागिरी) येथील असून या ग्राहकाच्या पाकीटमध्ये ७ हजार रुपये, आधार कार्ड, पॅनकार्ड, लायसन व इतर कागदपत्रे होती. संतोष सोनी यांनी पाकीट परत केल्यामुळे ग्राहकांने त्याचे आभार मानले. तसेच, गेल्या गणपतीमध्ये संतोष सोनी यांनी ५० हजार रुपयांचा मोबाईल परत केला होता.

# राष्ट्रीय महामार्गावर महिलेला चिरडले

**| पालघर | प्रतिनिधी |**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी (दि.०१) रात्री १० वाजताच्या सुमारास एका पादचारी महिलेला अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेने महिला खाली पडली आणि तिच्या अंगावरून अनेक वाहने गेल्यामुळे महिलेचा चिरडून दुर्दैवी मृत्यू झाला.

हा अपघात राष्ट्रीय महामार्गावर चारोटी हद्दीत बसवत पाडा समोर मुंबई वाहिनीवर झाला असून महिलेचा मृतदेह चिरडल्यामुळे ओळख पटवणे कठीण झाले आहे.

कासा पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून महिलेचा मृतदेह कासा उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. महिलेची ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरू असून पुढील तपास कासा पोलीस करत आहेत.

# बाजारात केवड्याची मोठ्या प्रमाणात विक्री

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवात गणपती बाप्पाला अनेकजण केवड्याची पात देखील वाहतात. त्यामुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी केवडा विक्रीसाठी आलेला असून केवड्याला प्रचंड मागणी आहे. बाजारात सध्या केवड्याचे एक पाते दहा रुपयाला मिळत आहे.

सद्यस्थितीत या केवड्याची वनांची संख्या कमी होत असली तरी अजूनही केवड्याची वने शिल्लक आहेत. श्रीवर्धन, दिवेआगर, रेवदंडा, मुरुड, अलिबाग आदी समुद्रकिनारी केवड्याची वने पाहायला मिळतात. एरवी



या केवड्याला फारसे महत्त्व नसते. मात्र गणेशोत्सवात या केवड्याला खूप महत्त्व प्राप्त होते. गणरायाच्या मूर्ती शेजारी तसेच गौरीच्या इथे देखील केवड्याची पात ठेवली जाते. गणपतीला दुर्वा, जास्वंद फूल व केवडा वाहिला जातो. तर गौरीला मोगऱ्याची फणी, गजरा व केवडा वाहिला जातो. अनेक महिला केवड्याची पाती घेऊन विक्रीसाठी येत आहेत. त्यामुळे त्यांनाही रोजगार मिळत आहे.

### बहुपयोगी केवडा

केवडा ही बहुउपयोगी वनस्पती असून पूजा संसाधना बरोबरच सुगंधी औषधी, अगरबत्ती व इतर उत्पादनासाठी केवड्याचा उपयोग होतो. फुलांचा वापर केवडा अत्तर, केवडा तेल व केवडा पाणी यासाठी करतात. केवड्याच्या पाण्याचा वापर विविध प्रकारांच्या मिठायांत केला जातो. सरबते तयार करण्यासाठी देखील केवडा पाण्याचा वापर केला जातो. केवडा तेलाचा वापर पान मसाल्यात, जर्दा तसेच उच्च प्रतीच्या सौंदर्यप्रसाधनात केला जातो.

## मराठा आंदोलकांना मारहाण करणारे अटकेत

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदान येथे सुरू केले. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी पुण्याहून पिकअप टेम्पो घेऊन मुंबईत जाणाऱ्या मराठा तरुणांना आठ ते दहा जणांनी किरकोळ कारणावरून बेदम मारहाण केल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली होती. या मारहाणीत पाच मराठा तरुण जखमी झाले आहेत. पनवेल शहर पोलिसांनी मारहाण करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यापैकी पाच आरोपींना अटक केली आहे. तसेच, इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे.

## वीस वर्षांपासूनची आदर्शवत प्रथा | एकत्र येत गौरी गणपतीचा सण साजरा

# हुमगावातील तीस कुटुंबांचा एक बाप्पा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यातील हूमगाव ही गाव भांडण तंटे यांच्यापासून अनेक दशके दूर असलेले गाव समजले जाते. या गावातील ३० कुटुंबांनी एकत्र येत २० वर्षापूर्वी एक गणपती आणण्याचा निर्णय घेतला आणि जवळपास १५० भक्त एकत्र येऊन हा सोहळा साजरा करतात.**

हूमगाव ही गाव टाटा कंपनी परिसरातील असून या गावाच्या आजुबाजूला दुबार भाताची शेती केली जाते. टाटा धरणातील पाणी कालव्यातून सोडले जात असल्याने २४ तास पाणी असलेले भाग म्हणून हे गाव ओळखले जाते. या गावातील शेतकरी हे देखील समूह शेती करून आदर्शवत कार्य करीत



आहेत. त्याचवेळी अवजारे यांचा वापर करून केली जाणारी शेती ही देखील केली जाते. मात्र हुमगाव हे गाव रायगड जिल्ह्यातील पहिले महात्मा गांधी तंटामुक्त गाव बनले होते. तसेच संत गाडगे महाराज स्वच्छता अभियानमध्येदेखील पहिल्याच टप्प्यात हे गाव स्वच्छ गाव ठरले होते. तर हागणदारी मुक्त अभियानमध्येदेखील या गावाने पहिल्या टप्प्यात यशस्वी होत राष्ट्रपती पदक मिळविले होते.

अशा आगळ्यावेगळ्या गावात राहणारे बागडे कुटुंब यांनी २००४ मध्ये आदर्शवत असे कार्य केले आहे. या गावातील ३० बागडे कुटुंब यांनी एकत्र येत भाद्रपद महिन्यात घरोघरी येणारे बाप्पा यांची प्रथा बंद केली. त्यानंतर बागडे कुटुंबातील पाच प्रमुख कुटुंब आहेत. यावर्षी एका कुटुंबाकडे तर पुढील वर्षी दुसऱ्या कुटुंबाकडे हा बाप्पा स्थापन केला जातो. २००४ पासून आळीपाळीने हा बाप्पा त्या-त्या कुटुंब प्रमुखाच्या अंगणात विराजमान झाला होता. पुढे त्या पाच प्रमुख कुटुंब यांच्या मुलांच्या घरी हा गणपती बसविला गेला आहे. अशाप्रकारे ही प्रथा सुरू असून गेली २० वर्षे सर्व ३० बागडे कुटुंब गणेशोत्सव उत्सवासाठी एकत्र येतात आणि सण साजरा करतात. या काळात दोन्ही वेळेचे जेवण गणपती असलेल्या बागडे कुटुंबाकडे होत असते. सकाळ आणि सायंकाळ अशा दोन्ही आरतीचे वेळी साधारण १०० लोक एकत्र येतात. तर नोकरीचे निमित्ताने बाहेर गावी राहायला गेलेले कुटुंबीय हे गणपती उत्सवासाठी एकत्र येतात आणि गौरी गणपतीचा सण साजरा करतात.

### बैलगाडा शर्यतीचा देखावा

कर्जत तालुक्यात बैलगाडा शर्यत अधिक लोकप्रिय आहे. त्यामुळे बागडे कुटुंबाने आपल्या एकत्रित कुटुंबाच्या गणेश उत्सवात हिंद केसरी मैदान असा देखावा तयार करण्यात आला. हा देखावा पाहण्यासाठी आजुबाजूच्या गावातील भक्त येतात.

# निवडक



## शृंगारतळीतील खड्डे बुजवले

**गुहागर** : गुहागर विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील शृंगारतळी बाजारपेठेतील फुल मार्केट या ठिकाणी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले होते. हे खड्डे गणेशोत्सवापूर्वी तात्काळ न भरल्यास गुहागर मनसेचे उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांनी खड्डयात वृक्षारोपण करण्याचा इशारा दिला होता. अखेर मनसेच्या या दणक्यानंतर हे खड्डे तात्काळ भरण्यात आले. या ठिकाणाहून प्रवास करताना वाहन चालकांसह प्रवासी व नागरिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. गणेशोत्सव दरम्यान शृंगारतळी बाजारपेठेमध्ये हजारो ग्राहक येत असतात, परंतु फुल मार्केट येथील रस्त्यावर पडलेले खड्डे सर्वांनाच मनस्ताप सहन करणारे ठरत होते. अखेर शेवटी मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी, उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवरकर, तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर व अन्य पदाधिकारी यांनी दोन दिवसात खड्डे न भरल्यास वृक्षारोपण करू असा इशारा अधिकाऱ्यांना दिला होता. मनसे उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांच्या दणक्याने राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ रस्त्यावरील खड्डे बुजवले. यावेळी राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी खुणेकर यांनी खड्डे तात्काळ भरल्याने मनसेच्या वतीने त्यांचे आभार माणण्यात आले.



## कातळशिल्पाचे होणार संवर्धन

**रत्नागिरी** : देवाचे गोठणे रावणाचा माळ येथील प्रागौतिहासिककालीन कातळशिल्प हे संरक्षित स्मारक म्हणून उदयाला येण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने आगामी दोन महिन्यांच्या कालावधीत त्यासाठी हरकती वा सूचना मागवल्या आहेत. महाराष्ट्रातील प्राचीन स्मारके व पुराण वास्तू शास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६० अन्वये अधिसूचना जारी करण्यात आली आहे. हे कातळशिल्प राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या दृष्टिकोनातून प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही कार्यवाही हाती घेण्यात आली आहे. देवाचे गोठणे येथे मुकुंद वासुदेव आपटे व गोविंद शंकर आपटे यांच्या जमीन मिळकतीत हे प्रागौतिहासिककालीन कातळशिल्प आढळून आले. या कातळशिल्पामध्ये एक मनुष्यकृती दर्शवण्यात आली आहे. देवाचे गोठणे हे रत्नागिरी जिह्यातील राजापूर तालुक्यातील एक गाव आहे, जेथे कातळशिल्पे आहेत. या कातळशिल्पांमध्ये आदिमानवाने विविध आकार कोरलेले आहेत आणि ती सुमारे ४५ हजार वर्षांपूर्वीची असावीत असा अंदाज आहे.

## कल्याण, डोंबिवली शहरातील रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग

**ठाणे** : कल्याण, डोंबिवली शहराच्या अनेक भागात, तसेच शिळफाटा रस्त्याच्या मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर, एमआयडीसी परिसरातील रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. अनेक दिवस हा कचरा उचलला जात नाही. त्यामुळे पावसामुळे हा कचरा



भिजून परिसरात दुर्गंधी पसरत आहे, अशा तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. गणेशोत्सवाचे दिवस सुरू असून नागरिक गणपती दर्शनासाठी फिरण्यासाठी बाहेर पडत आहेत. परंतु, त्यांना शहराच्या विविध भागात, मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर कचरा आढळून येत आहे. डोंबिवली गणेशनगर भाग, बावनचाळ परिसरात नागरिकांनी मोकळ्या जागांमध्ये कचरा टाकला आहे. या कचऱ्यातील पिशव्यांमध्ये असलेले पदार्थ खाण्यासाठी भटके श्वान याठिकाणी येतात. ते या भागातून जाणाऱ्या प्रवासी, दुचाकीस्वार, रिक्षा चालकाच्या पाठीमागे टोळीने पाठलाग करत आहेत. त्यामुळे शहराच्या विविध भागात पडणारा कचरा पालिकेने तातडीने उचलावा, अशी मागणी नागरिक करत आहेत.

## सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात

**नवी मुंबई** : मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२ नैसर्गिक विसर्जनस्थळे तसेच १४३ कृत्रिम विसर्जन स्थळे पालिकेने सज्ज ठेवली आहेत. गुरुवारी दीड दिवसाच्या गणेशमूर्ती विसर्जनावेळी न्यायालयाच्या निर्देशानुसार सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात होणे गरजेचे होते. मात्र, गणेशभक्तांनी याकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. प्रत्येक तलावाजवळ पालिका प्रशासनाचे अधिकारी व पोलीस व्यवस्था असतानाही त्यांच्या दुर्लक्षामुळे तसेच नागरिकांच्या विरोधामुळे न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन झाल्याचा आरोप होत आहे. याबाबत सजग नागरिक मंच यांनी पालिकेला नोटीस बजावली होती. त्यामुळे पालिका आयुक्त व सर्व प्रशासकीय यंत्रणांनी पाच दिवसांच्या गणेशमूर्ती विसर्जनावेळी नैसर्गिक तलावांच्या ठिकाणी विशेष लक्ष देत सहा फुटांच्या आतील मूर्तींचे कृत्रिम तलवातच विसर्जन करून घेतले.

## इमारतीचा स्लॅब कोसळला

**ठाणे** : ठाण्यातील किसन नगर क्र. २ मधील मस्जिद गल्लीमध्ये तिवारी सदन ही इमारत तळ अधिक ३ मजली असून सुमारे ४० वर्षांपूर्वी बांधलेली आहे. ही इमारत सी २ बी प्रवर्गातील असल्याने आधीपासूनच धोकादायक स्थितीत असून, सद्यस्थितीत तिच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम सुरू होते. मंगळवारी दुपारी या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीचा स्लॅब कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. घटनेची माहिती मिळताच ठाणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षासह सार्वजनिक बांधकाम आणि अतिक्रमण विभागाचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत संपूर्ण इमारत रिकामी केली आहे.



# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



● स्व. नारायण सखाराम कुथे, श्रीगाव येथील रेढ्या मुखी वेद, संत मुक्ताई ज्ञानदेवाच्या पाठीवर मांडे भाजले, माऊलीने भिंत चालवून चांगदेवाचे गर्वहरण केले. (छायाचित्र : जीवन पाटील, भाकरवड)



● श्री. सदानंद गणपत म्हात्रे, मानी यांच्या येथील श्रीं ची भव्य मुर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● मुरुड-मजगांव येथील धैर्य निखिल मानाजी आपल्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणराया. (छायाचित्र - राजीव नेवासेकर)



● अनिल नारायण वर्तक, ओंकार फ्रेंड सर्कल, वरसोली-अलिबाग यांचे निवासस्थानी विराजमान झालेले गणराय



● माणगाव येथील भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे व महिला मोर्चा तालुकाध्यक्षा रचना थोरे यांच्या निवासस्थानी आकर्षक सजावटीसह स्थानापन्न गणराय. (छायाचित्र : सलीम शेख)




● अभिजीत वसंत ठाकूर, मुरुड-शेगवाडा यांच्या निवासस्थानी ऑपरेशन सिंदूरवर आधारित देखावा व श्रीगणेशमुर्ती. (छायाचित्र - सुधीर नाझरे)



● आई फाऊंडेशनचे संस्थापक सागर पवार, किहीम यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच श्री. प्रसाद (पिंट्या) गायकवाड (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. सुमित संतोष पाटील, पेझारी-आंबेपूर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा. (छायाचित्र - जीवन पाटील, भाकरवड)



● किहीम सरपंच श्री. प्रसाद (पिंट्या) गायकवाड यांचे निवासस्थानी ग्रामपंचायत सदस्या सौ. निधी काठे, सौ. कल्पिता आमले, जान्हवी वाघे यांनी गणरायासह गौरीचे दर्शन घेतले.(छायाचित्र : सुरेश खडपे)




● चोंढी येथील बंड्या शेठ उर्फ संदीप आमले यांच्या येथील गणरायासह केलेली गौरीची मनमोहक सजावट. (छायाचित्र - सुरेख खडपे)



● श्री. शिरधनकर बंधू, सातिर्जे यांनी श्रीगणेशाची केलेली नयनरम्य सजावट. (छायाचित्र - सुरेश खडपे)



● आदरणीय प्रकाशदादा ठाकूर, झिराड यांचे निवासस्थानी श्री गणरायाची नयनरम्य मुर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● किहीम ग्रामपंचायत सदस्या नूतन थळे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच व सदस्या. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)





● किहीम ग्रामपंचायत सदस्य साहिल पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच व सदस्या. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● किहीम ग्रामपंचायत उपसरपंच मिलिंद पडवळ यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच व सदस्या. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● किहीम ग्रामपंचायत सदस्या स्नेहा आर्ते यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच व सदस्या. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. तुषार गजानन कवळे, आवास-अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची आकर्षक मुर्ती व देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. अशोक दामुशेठ म्हात्रे यांच्या निवासस्थानी श्री गणेशाची केलेली मनमोहक सजावट (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री. प्रसाद (पिंट्या) गायकवाड, सरपंच किहीम ग्रामपंचायत यांनी श्री गणेशासह गौरींचे केलेली मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)




● विजय मोरे, सोगाव यांच्या निवासस्थानी विराजमान गौरी गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच श्री. प्रसाद (पिंट्या) गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

# शौचालय-मुतारीअभावी कुचंबणा

## ● गैरसुविधेमुळे आरोग्य धोक्यात

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**तालुक्याची बाजारपेठ असलेल्या पोलादपूर शहरात गेल्या काही वर्षांपासून ग्रामीण भागातून येणाऱ्या आबालवृध्द स्त्री-पुरूष जनतेसाठी मुतारी असावा अशी माफक अपेक्षा व्यक्त होत असताना आता ग्रामीण भागातील जनतेसाठी सार्वजनिक शौचालय उभारण्याचा निर्धार सामाजिक संघटनेने घेतला आहे. याबाबतचा निर्णय पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी घेणार की, पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी घेणार, याबाबत दुमत असून शौचालय की मुतारी? की काहीच नाही? अशा अटकळी लावल्या जात आहेत. दरम्यान, पोलादपूर शहरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हजारो कोकणवासिय नोकरदार कुटूंबियांचे आगमन झाले असताना असंख्य ग्रामीण जनतेला शौचालय - मुतारी अभावी कुचंबणेला सामोरे जावे लागले आहे. सर्वांनी ही कुचंबणा सहन केली असून पुढील वर्षात तरी या प्रश्नी सोडवणूकीची अपेक्षा गणेशभक्तांकडून व्यक्त होत आहे.**



पोलादपूर शहरात लता कळंबे या तालुक्यातील माहेरवाशिणी सहा वर्षांपूर्वी महामार्गावरील आरोग्यविषयक गैरसुविधेमुळे महिलांच्या कुचंबणेविरोधात राईट टू पी प्रश्नावर तब्बल तीन दिवस उपोषणाला बसल्या होत्या. यानंतर पेट्रोलपंप आणि महामार्गालगतच्या हॉटेल्स व एसटी स्थानकामध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह याप्रश्नी सुसज्ज ठेवण्यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग तसेच राज्यसरकारकडून निर्णय घेण्यात आला. मात्र, पोलादपूर तालुक्याची ग्रामपंचायत असलेल्या पोलादपूर शहरासाठी दहा वर्षांपूर्वी नगरपंचायत अस्तित्वात येऊनही नगरपंचायतीच्या विकासकामांमध्ये राईट टू पी म्हणजे लघवी करण्याचा अधिकार व सुविधा या प्रश्नावर दुर्लक्ष झाले आहे. ग्रामीण भागातून बाजारहाट, तसेच विविध कारणांनी तसेच काम काजानिमित्त पोलादपूर शहरात येणाऱ्या स्त्रिया व पुरूषांचे आरोग्य या गैरसुविधेमुळे धोक्यात आले आहे. पोलादपूर नगरपंचायतीने काही वर्षांपूर्वी तलाठी सजेमागे पोलादपूर नगरपंचायत हद्दीत असलेल्या इमारतीचा वापर स्त्रिया व पुरूषांकडून लघवी करण्यासाठी करण्यात येऊन आरोग्यविषयक कुचंबणा दूर करण्यासाठी केला जात आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांबाबत गटविकास अधिकारी यांच्याकडे चर्चा केली गेली तरी पोलादपूर शहरातील जमिनीचा विषय असल्याने याबाबत पोलादपूरचे मुख्याधिकाऱ्यांकडेही चर्चा होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे भविष्यात शौचालय होणार की मुतारी की काहीच नाही केवळ चर्चेचेच गुऱ्हाळ, अशी मानसिकता या कुचंबणा प्रश्नी ग्रामीण जनतेमध्ये व्यक्त होत आहे.

### ग्रामीण जनतेचे हाल

पोलादपूर शहरात गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण जनतेची कुचंबणा कायम ठेवणाऱ्या शौचालय की मुतारी या प्रश्नाची सोडवणूक न झाल्याने हजारो नोकरदार कोकणवासिय स्त्रीपुरूष कुटूंबियांपैकी अनेकांना यंदाच्या गणेशोत्सवात पोलादपूर शहराच्या बाजारपेठेमध्ये खरेदी करताना ही कुचंबणा सहन करावी लागली आहे.

# तळा बसस्थानकातून एसटीच्या जादा गाड्या

**। तळा । वार्ताहर ।**

गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या शहरातील चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुखकर होणार असून तळा बसस्थानकातून बुधवार दि.३ व गुरुवार दि.४ सप्टेंबर रोजी एसटीच्या जादा गाड्या सोडण्यात येणार असल्याची माहिती वाहतूक नियंत्रक प्रशांत मांदुस्कर यांनी दिली आहे. तळा बसस्थानकातून दोन दिवस एसटीच्या जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. ज्यामध्ये बुधवार दि.३ सप्टेंबर रोजी तळा ते मुंबई साठी दुपारी १२ वा.१२.३० वा.१ ३० वा.आणि २ वा. अशा चार गाड्या सोडण्यात येणार आहेत.तळा ते बोरिवली साठी ११ वा. ११.३० वा. १२.३० वा. १ वा. २ वा. आणि २.३० वा.अशा सहा गाड्या सोडण्यात येणार आहेत.तळा ते नालासोपारासाठी सकाळी ८ वा.दुपारी १२ वा.१ वा.१.३० वा.२ वा. ३ वा. ३.३० वा.आणि ४.३० वा. अशा आठ जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.तर गुरुवार दि.४ सप्टेंबर रोजी तळा ते मुंबई साठी दुपारी १.३० वा.तळा ते बोरिवलीसाठी दुपारी १२ वा.२ वा. आणि २.३० वा. अशा तीन जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.



## ‘गोष्ट धमाल गावाची’ चे प्रकाशन

**। उरण । प्रतिनिधी ।**

नाटककार किशोर पाटील यांच्या ‘गोष्ट धमाल गावाची’ या नाटकाच्या हस्तलिखित प्रतीचे पूजन प्रा.एल बी पाटील आणि प्रकाशन जीवन गावंड यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम पिरकोन या गावी संपन्न झाला. शेखर पाटील यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन विलास गावंड यांनी केले. यावेळी दिनेश गाताडी, महेंद्र गावंड, धिरेंद्र ठाकूर, जगदीश गावंड, अमृत म्हात्रे, राजेंद्र गावंड, एकनाथ म्हात्रे, छगन गावंड उपस्थित होते.

# नेरळमध्ये रस्त्यावरील डांबर गायब

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ, ममदापूर आणि कोल्हारे या तीन ग्रामपंचायतीचा नियोजनबद्ध विकास व्हावा यासाठी राज्य नगररचना विभागाच्या मान्यतेने नेरळ विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले.त्याच नेरळ विकास प्राधिकरणमधील ममदापूर ग्रामपंचायतीमध्ये रस्त्यांची सुविधा देखील प्राधिकरण पूर्ण करू शकले नाही. दरम्यान आखाडेवाडी ते ममदापूरवाडी या भागातील दोन किलोमीटर लांबीचा रस्ता हा खड्ड्यांनी व्यापलेला असून त्या रस्त्यासाठी वापरलेले डांबर शिल्लक राहिलेले नाही.



नेरळ जवळील ममदापूर ग्रामपंचायतीमधील आखाडेवाडी येथून ममदापूरवाडीकडे जाणारा रस्ता २००५ मध्ये जिल्हा परिषदेच्या निधीमधून बनविण्यात आला होता. रस्ता ममदापूर गावातून ममदापूरवाडी असा तीन किलोमीटर लांबीचा बनविण्यात आला होता. या रस्त्यातील सुरुवातीचा भाग सिमेंट काँक्रिटचा बनविला गेला असून पुढे नेरळ विकास प्राधिकरणमधील गार्डन जवळील रस्ता देखील सिमेंट काँक्रिटचा बनविला आहे. मात्र, तेथून पुढे ममदापूर वाडी कडे जाणारा रस्ता हा खडी टाकून बनविला होता. त्यातील दिलकॅप महविद्यालय ते ममदापूरवाडी अस रस्ता देखील डांबरी बनविण्यात आला होता. मात्र आता हा रस्ता पूर्णपणे खड्ड्यात हरवला असून त्या रस्त्यावर डांबर शिल्लक राहिली नाही.

# पथदिव्यांमुळे वाहतूक कोंडीत पडणार भर

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथे सध्या सौरऊर्जेवर चालणारे डेकोरेटिव्ह स्मार्ट स्ट्रीट लाईट पोल व हायमास्ट बसवण्याचे काम सुरू आहे. घाईघाईत काम उरकण्यात मग्न असलेल्या कंत्राटदाराने खांबा साठी पाया करतांना अनेक ठिकाणी रस्त्याच्याची रुंदी न बघता रस्त्याच्याकडेला खांबाचा पाया उभारला आहे. आधीच अरूंद रस्ते त्यातच खांब यामुळे वाहतूक कोंडीत आणखीन भर पडणार आहे.



सहा मीटर उंचीचे १५० डेकोरेटिव्ह खांब आणि १२.५ मीटर उंचीचे १२ हाय मास्ट बसवण्याचे काम भर पावसाळी दिवसात अनेक ठिकाणी सुरू आहे. बहुतांश ठिकाणी रस्त्यालगतचे पिचींग फोडीत त्यावर खांबाचा पाया बांधला आहे. तर काही ठिकाणी अरूंद मार्गावर रस्ता व पिचींगच्या मधोमध खांबासाठी पाया उभा केला आहे. भविष्यात या खांबामुळे अरूंद रस्त्यावर वाहतूक कोंडीत आणखीन भर पडणार आहे.

गेले दोन दिवस शहरात बांधलेल्या पायांवर डेकोरेटिव्ह पथदिव्यांचे खांब उभे केले जात आहेत. यात अनेक खांब बागायती झाडांच्या फांद्यामध्ये गुरफटले गेलेत. नगरपरिषदेच्या पथदिव्यांच्या खांबासमोरच डेकोरेटिव्ह पथदिवे उभारण्यात येत आहेत. याचे नक्की नियोजन काय असावे असा संभ्रम नागरिकांना झाला आहे.

# द्रोणागिरी नोड वसाहत समस्यांनी ग्रस्त



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात द्रोणागिरी नोड हे नव्याने विकसित झाला असून सिडको प्रशासनातर्फे हे द्रोणागिरी नोड वसाहत वसविली आहे. नव्याने वसाहतीकरण व शहरीकरण होत असल्याने व दळणावळणाच्या दृष्टीने द्रोणागिरी हे स्थान तालुक्याच्या मधोमध, केंद्रस्थानी असल्यामुळे तालुक्यात राहणारे व तालुक्याच्या बाहेरील अनेक नागरिकांनी येथे मोठ्या प्रमाणात घरे विकत घेतली आहेत. आलिशान व सुंदर दिसण्या टोलेजंग दिसणाऱ्या इमारतीमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घेत विकत घेतली आहेत. येथील बिल्डरांनी, विकसकांनी सर्व सेवा सुविधा उपलब्ध असल्याचे सांगून ग्राहकांना घरे मोठ्या प्रमाणात विकली आहेत. सिडको प्रशासनानेही द्रोणागिरी नोडमध्ये सर्व सेवा सुविधा पुरविण्याचे आश्वासन नागरिकांना, जनतेला दिले होते. मात्र प्रत्यक्ष द्रोणागिरी वसाहत बसवून आज अनेक वर्षे झाले तरी देखील आजही द्रोणागिरी परिसरात पाणी वीज रस्ते, हॉस्पीटल, स्मशानभूमी, पोलीस स्टेशन, दळणावळणा साधने, शाळा कॉलेज, सांडपाण्याची सोय, खेळासाठी मैदान, विविध सण उत्सव साजरे करण्यासाठी मोठे व सुसज्ज असे सभागृह आदी कोणतेही सेवा सुविधा पुरविले नसल्याने द्रोणागिरी नोड परिसरात विविध इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी सिडको प्रशासना विरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. द्रोणागिरी नोडमध्ये व आजूबाजूच्या परिसरात अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देखील नाहीत तरी बिल्डर लॉबीकडून मोठया प्रमाणात इमारती बांधण्याचे काम सुरूच आहे. द्रोणागिरी परीसरात अनेक अवैध कामे, बेकायदेशीर पार्किंग, रस्त्यावर पानटपरी, हातगाड्यांचे स्टॉलचे अतिक्रमण झाले आहे. या गंभीर बाबीकडेही सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष चालूच आहे. यामुळे या परिसरात चोऱ्यांचे, अपघातांचे व विविध गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांना मूलभूत सेवा सुविधाच मिळत नसल्याने सिडकोच्या कार्य पद्धतीवरच प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहेत. द्रोणागिरी नोड व द्रोणागिरी नोडच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी विविध समस्येच्या संदर्भात सिडको प्रशासनाकडे अनेक वेळा वारंवार पत्रव्यवहार करून देखील, विविध समस्या त्वरीत सोडविण्याची मागणी करून देखील सिडको प्रशासनाने, सिडकोच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्यांकडे नेहमीच जाणून बुजून दुर्लक्ष केलेले आहे. द्रोणागिरी नोड नागरिकांचा जीव घेण्यासाठी वसविली आहे का असा सवाल प्रशासनाला केला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे कामतपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून, आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

-: जमीन मिळकतीचे वर्णन :-

मौजे- कामतपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्रीम. गुलाब काशिनाथ सावंत व इतर | ५७/१/अ/१ | ०.९२.५० | ०.६८ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क -हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्रीम. गुलाब काशिनाथ सावंत व इतर यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल व सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत

दिनांक : ०३/०९/२०२५

सही/-

**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**

पत्ता - शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्,

मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१.

मो. नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८

minakshibhase@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मोहन आत्माराम पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकतीमध्ये जाणे-येणेचा रस्ता उपलब्ध आहेत व सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| २२१ | ०-६८-३० | १४.९४ |

सदर मिळकतीपैकी श्री. मोहन आत्माराम पाटील यांचे मालकीचे ०-४८-३० हे.आर. इतके क्षेत्र

वर नमूद मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग

दिनांक ०३/०९/२०२५

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**

‘अन्नपूर्णा’ मु.पो. धोकवडे

ता. अलिबाग, जि. रायगड


# खोपटे येथे कवी संमेलन

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेच्या कवींचे खोपट्याच्या धसाखोशी गावामध्ये केशव म्हात्रे यांच्या घरी गणेशोत्सवानिमित्त दरवर्षी होणारे कविसंमेलन सोमवार (दि.०१) सप्टेंबर रोजी प्रा एल. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

यावेळी अनिल भोईर, भरत पाटील, नरेश पाटील, गजानन म्हात्रे अनुज शिवकर, के. म्हात्रे, अजय शिवकर, म. का. म्हात्रे, प्रा. एल. बी. पाटील यांनी काव्य सादर केले. यावेळी नीतेश म्हात्रे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दिलीप पाटील, देविदास म्हात्रे, राजश्री भगत, संगीता पाटील, ज्योती म्हात्रे, गौरव मोकाशी उपस्थित होते.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ जन्नावार हॉस्पिटल अलिबाग मध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

■ नारळ गोठे पाहिजेत-७०६६१३८३६८ ❋ इलेक्ट्रिशन पाहिजे-७०६६१३८३६८

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.

मोबाईल : ९८६०६५८५६५


## निवडक

### कापडी पिशव्यांचे वाटप

**अलिबाग :** गणेशोत्सवानिमित्त लायन्स क्लब मांडवा यांने पर्यावरणपूरक उपक्रम राबवला. या उपक्रमांतर्गत, क्लबने निर्माल्य गोळा करण्यासाठी नागरिकांना ३००० कापडी पिशव्यांचे वाटप केले. २७ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०२५ या कालावधीत अलिबाग आणि मांडवा परिसरातील अनेक घरांपर्यंत या पिशव्या पोहोचवण्यात आल्या. या उपक्रमाचा मुख्य उद्देश गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणात पर्यावरणाचे रक्षण करणे हा आहे. गणेशोत्सवादरम्यान मोठ्या प्रमाणात निर्माल्य तयार होते, हे प्लास्टिक पर्यावरणासाठी अत्यंत हानिकारक आहे. त्यामुळे, प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशव्या वापरण्यास प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू होता. क्लबच्या सर्व सदस्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. सदस्यांनी घरोघरी जाऊन कापडी पिशव्यांचे वाटप केले आणि नागरिकांना पर्यावरण संरक्षणाचे महत्व पटवून दिले. या माध्यमातून स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन याविषयी जनजागृती करण्यात आली. कापडी पिशव्यांचा वापर करून गणेशोत्सव अधिक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक कसा साजरा करता येईल, यावर भर देण्यात आला. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी हा उपक्रम एक महत्वाचे पाऊल ठरले आहे. याबद्दल, लायन्स क्लब मांडवा यांचे सामाजिक कार्याबद्दल आभार मानले.



### ‘कवी संमेलन उपक्रमांना बळ देणार’

**पनवेल :** ग्रामीण भागातील कवी संमेलने कोकण मराठी साहित्य परिषदेच्या उपक्रमांना बळ देणारी असल्याचे मत कोकण मराठी साहित्य परिषदेचे प्रा.एल.बी.पाटील यांनी अलिबाग येथे उरण कोमसापतर्फे आयोजित केलेल्या कवी संमेलनाच्यावेळी व्यक्त केले. अलिबाग तालुक्यातील भाकरवड येथे गणोत्सवानिमित्त झालेल्या कवी संमेलनास रायगड जिल्हा कोमसापचे अध्यक्ष संजय गुंजाळ, गणेश कोळी, जगन्नाथ राऊत, जीवन पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, रमेश थवई आदी उपस्थित होते. या कवी संमेलनात अनिल भोईर, रमेश थवई, अजय शिवकर, मोहनलाल पाटील, दिलीप पाटील, नरेश पाटील, अनुज शिवकर, महेंद्र पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, गौरीश पाटील, मोहन पाटील, केशव म्हात्रे, दिपक गावंड आदींनी आपल्या वेगवेगळ्या विषयांवरच्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे आयोजन नरेश पाटील यांनी केले होते. यावेळी संजय गुंजाळ, गणेश कोळी यांचा सत्कार करण्यात आला.

### प्रवीणकुमार यांना शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर



**उरण :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय दर्पण शिक्षक गौरव पुरस्कारांची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी केली आहे. यात उरण, जि. रायगड येथील प्रवीणकुमार संग्राम तोगरे यांच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याची दखल घेवून त्यांना राष्ट्रीय दर्पण शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा राष्ट्रीय पुरस्कार विवार, दि. ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वा. रोटरी क्लब हॉल, गंजमाळ, शालिमार, नाशिक येथे संपन्न होणार आहे. हा कार्यक्रम अतिविशिष्ट मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. त्यांना हा पुरस्कार मिळणार असल्यामुळे विविध स्तरावरून तोगरे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### भावशेत येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**पाली/गोमाशी :** सुधागड तालुक्यातील भावशेत या निसर्गरम्य गावात श्री समर्थ कृपा मंडळ भावशेत यांच्या वतीने सालाबादप्रमाणे गणेश चतुर्थीचे औचित्य साधून २७ ऑगस्ट रोजी इयत्ता १० वी,१२ वी, पदवीधर गुणवंत विद्यार्थ्यांना तसेच ज्येष्ठ नागरिक महिला, पुरुष यांना यांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. या मंडळाकडून माहेरवाशियाना सन्मानचिन्ह व माहेरची साडी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना सेंद्रियशेती, शेतीपूरक व्यवसाय, विषमुक्त शेती, गट शेती, फळबाग, प्लॅस्टिकचे दुष्परिणाम, शेतीचे भावी काळातील महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी जनार्दन भिलारे, दिपक दंत, ग्रामस्थमंडळ, विद्यार्थी, मुंबई, ठाणे, पुणे येथील सर्व सदस्य, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयवंत दंत यांनी केले.

### खड्ड्यात होडी सोडा आंदोलन

**पाली/वाघोशी :** गणपती उत्सव संपता आला तरी सुधागड तालुक्यातील पाली-खोपोली राज्य महामार्गावरील प्रचंड खड्डे भरले गेलेले नाहीत. ‘रस्त्यावरील खड्डे भरायची जबाबदारी असलेले साबा खाते व एमएसआरडीसी यांची आहे. त्यामुळे अधिकारी बहिरे-आंधळे झाले आहेत का? असा थेट सवाल करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मंगळवारी अनोखे ‘खड्ड्यात होडी सोडा आंदोलन’ करून प्रशासनाची खिल्ली उडवली. जांभूळपाडा गावा समोरील प्रवेशद्वारासमोर पडलेल्या भल्या मोठ्या खड्ड्यात मनसैनिकांनी होडी सोडून ‘सरकारने केलेले काम म्हणजे मृत्यूचा सापळा असा हल्लाबोल यावेळी करण्यात आला. या आंदोलनात मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे, अजय अधिकारी, रवींद्र कदम, मारुती वारे, रमेश पवार, ग्रामस्थ राजू मांडवकर, अविनाश शिंदे, प्रशांत कदम, उमेश अधिकारी, सचिन सगळे, मिलिंद नखाते, रवी पवार तसेच महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

